पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २४८ ■ बुधवार, दि. १८ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# उद्धव सेनेला खिंडार; 4 नगरसेवक शिंदे सेनेत

## ▶▶ आमदार नितीन देशमुखांना मोठा धक्का ▶▶ भाजपची पड्यामागून खेळी यशस्वी ?




प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला:** राज्याच्या राजकारणात सध्या मोठी उलथापालथ सुरू असतानाच, अकोला महानगरपालिकेत उद्धव ठाकरे गटाला मोठा हादरा बसला आहे. शिवसेनेचे (उबाठा) आमदार नितीन देशमुख यांचे खंदे समर्थक मानले जाणारे जिल्हाप्रमुख मंगेश काळे यांच्यासह चार नगरसेवकांनी रात्री उशिरा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला. या पक्षफुटीमागे भाजपचा हात असल्याची ओरड उध्दव सेनेत आहे. जे चार नगरसेवक हिंदूत्वाच्या मुद्यांवर भाजप सोबत जाण्यास तयार होते ते भाजप मध्ये थेट न घेता शिंदे सेनेत का पाठविले असा प्रश्न विचारला जात असून या मागे विधान परिषद निवडणूकीची छुपी रणनिती असल्याची ओरड सुरु झाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन दिल्ली दौऱ्यावरून परतताच रात्री दोनच्या सुमारास ठाण्यातील त्यांच्या 'नंदनवन' निवासस्थानी हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

### यांनी घेतला शिवसेनेत प्रवेश

मंगेश काळे (जिल्हाप्रमुख, उद्धव सेना)
सुरेखा मंगेश काळे (नगरसेविका)
सागर भारुका (नगरसेवक)
मनोज पाटील (नगरसेवक)
सोनाली सरोदे (नगरसेविका)

### अकोला पुर्वसाठी भाजपची 'पड्याआड' खेळी ?

या फुटीमागे भाजपच्या एका माजी प्रदेश पदाधिकाऱ्याचा हात असल्याची चर्चा जोरात आहे. विधान परिषद निवडणुकीत गोपीकिशन बाजोरिया यांचे हात बळकट करण्यासाठी भाजपने ही पड्याआड रणनीती आखल्याचे बोलले जात आहे. या प्रवेशामुळे शिंदे गटाची ताकद वाढली आहे. शिंदेंचा गट हा एक वरुन आता पाच नगरसेवकांचा झाला आहे. अकोला पुर्व मतदार संघात भाजपच्या घटलेल्या नगरसेवकांची संख्या पाहता ती पुन्हा आपल्याकडे ओढण्यासाठी चाललेली तारेवरची कसरत आहे. हिंदूत्ववादी नगरसेवक भाजपकडे न घेता शिंदे सेनेत पाठविण्याच्या रणनितीवर हा पक्षप्रवेश झाला.

### महासभेतील पडीक वार्डचा निर्णय बदलणार

महासभेत सत्तारुढ शहर सुधार आघाडीचे ४४ नगरसेवक आणि एक अपक्ष, दोन काँग्रेस आणि तीन एम आय एम अशा ५० नगरसेवकांना थेट फायदा देणारा पडिक (सफाई वार्ड)चा निर्णय घेण्यात आला. आता शिंदे सेनेच्या चार नगरसेवकांना देखील या पडिक (सफाई वार्ड) चा दर महिन्याला लाखोंचा लाभ मिळण्यासाठी ५० वार्डाचा पडिकचा निर्णय बदलण्यात येणार असून तो आता एका भाजी बाजार वार्डासह ५५चा करण्याकडे शहर सुधार आघाडीचा निर्णय असेल अशी चर्चा रंगली आहे.

### नितीन देशमुखांची ताकद ओसरणार ?


अकोल्यात उद्धव सेनेची धुरा सांभाळणारे आमदार नितीन देशमुख यांच्यासाठी हा मोठा वैयक्तिक आणि राजकीय धक्का मानला जात आहे. सहापैकी चार नगरसेवक फुटल्यामुळे महापालिकेत उद्धव सेनेचे अस्तित्व धोक्यात आले आहे. 'निवडून आलेले नगरसेवक सांभाळण्यात उद्धव सेनेला अपयश आले,' अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगली आहे. इतकेच नाही उध्दव सेनेचे जिल्हाध्यक्ष पद मंगेश काळे यांच्याकडे होते. संघटनेतील पदाधिकारी सोडून जात असून त्यामागे कोण अशी विचारणा सुरु झाली आहे.

# भाजपवाले भाजपशी बेइमान, व्हायरल ऑडिओचे थैमान !

## कथित व्हायरल ऑडिओ प्रकरणी भाजप मध्ये खळबळ

### विद्यमान नगरसेविकेचे पती तथा भाजपचे सक्रिय कार्यकर्ते कपिल सारडा यांना नोटीस





प्रतिनिधी १८ मार्च

**वाशीमः** वाशिम जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षातील अंतर्गत वाद आता उघडपणे समोर येऊ लागले असून, एका कथित व्हायरल ऑडिओ क्लिपमुळे पक्षात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी भाजप नगरसेविकेचे पती तथा भाजपचे सक्रिय कार्यकर्ते कपिल सारडा यांना पक्षाकडून अधिकृत नोटीस बजावण्यात आली आहे. सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये सारडा यांनी वाशिम नगरपालिका निवडणुकीदरम्यान पक्षविरोधी काम केल्याची कबुली दिल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे ही ऑडिओ क्लिप जिल्हाभर चर्चेचा विषय ठरली आहे.

भाजपचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांनी जारी केलेल्या नोटिसनुसार, संबंधित ऑडिओमध्ये कपिल सारडा यांनी पक्षातीलच नेते आणि वाशिम नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष अशोक हेडा यांच्याविरोधात आक्षेपार्ह व अश्लील भाषेचा वापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच वाशिम नगर पालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ मधील भाजपचे अधिकृत उमेदवार अशोक हेडा यांच्या विरोधात काम करून उबाठाच्या विजयी उमेदवाराला मदत केल्याचाही ठपका ठेवण्यात आला आहे. याशिवाय, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दलही अवमानकारक वक्तव्य केल्याचा उल्लेख नोटिसमध्ये करण्यात आला आहे.

या सर्व बाबी पक्षशिस्तीच्या विरोधात असल्याचे नमूद करत, कपिल सारडा यांना ७ दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अन्यथा शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशाराही पक्षाकडून देण्यात आला आहे. या घटनेमुळे




वाशिममधील भाजपमध्ये सुरू असलेली अंतर्गत नाराजी आणि गटबाजी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. त्यामुळे येत्या काळात या प्रकरणाला अधिक राजकीय रंग चढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, कपिल सारडा हे स्वतःला सक्रिय भाजप कार्यकर्ता म्हणून विविध कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहणारे म्हणून ओळखले जातात. काही काळापूर्वी अपघातात पाय फ्रॅक्चर झाल्यानंतरही ते वॉकरच्या सहाय्याने कार्यक्रमांना उपस्थित राहत असल्याने चर्चेत होते. अशा परिस्थितीत त्यांची ही कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने पक्षातील निष्ठेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही दिवसांपूर्वी वाशिमचे विद्यमान आमदार यांचीही एक अशीच कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. त्यामध्ये त्यांनी खुद्द जिल्हा अध्यक्षाच्या पत्नीला पाडा असे म्हटले होते. त्यामुळे 'पक्षाचं नाही राहिलं भान' अनेक जण हुतात बेईमान, व्हायरल ऑडिओचे थैमान अशी चर्चा रंगू लागली असून, भाजपमध्ये व्हायरल ऑडिओ प्रकरणांचे थैमान सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. आता कपिल सारडा नोटिसला काय उत्तर देतात आणि पक्ष त्याच्यांवर पुढे कोणती कारवाई करतो, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. मात्र व्हायरल ऑडिओ क्लिपची दै. सिटीन्युज सुपरफास्ट पुष्टी करत नाही.

# इंदूरमध्ये ईव्हीएम चार्जिंगमुळे आग, ७ जणांचा मृत्यू

प्रतिनिधी १८ मार्च

**इंदूर:** इंदूरमधील बंगाली चौकाजवळच्या ग्रेटर बृजेश्वरी कॉलनीत बुधवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास भीषण दुर्घटना घडली. येथे एक इलेक्ट्रिक कार चार्जिंगला लावली होती, तेव्हा त्यात शॉर्ट सर्किट होऊन आग लागली, जीने बघता बघता तीन मजली घराला कवेत घेतले. यात शहरातील मोठ्या व्यावसायिकांसह ७ लोकांचा जळून मृत्यू झाला, तर ३ लोक गंभीर जखमी झाले आहेत. तपासात असेही समोर आले की, घराला इलेक्ट्रॉनिक कुलूपे होती. आगीदरम्यान वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे कुलूपे उघडली नाहीत आणि आत अडकलेल्यांना बाहेर काढणे कठीण झाले. बचाव पथकांना आत प्रवेश करण्यासाठी दरवाजे तोडावे लागले. पोलिसांनुसार, कारला लागलेली आग वेगाने घरापर्यंत पसरली. तिने आत ठेवलेल्या गॅस सिलिंडर्सना कवेत घेतले. थोड्या वेळाने एकापाठोपाठ एक सिलिंडर फुटू लागले, ज्यामुळे संपूर्ण परिसर हादरला. स्फोट इतका जोरदार होता की घराचा एक भाग कोसळला. आत झोपलेल्या लोकांना बाहेर पडण्याची संधीही मिळाली नाही.


इंदूरचे पोलीस आयुक्त संतोष कुमार सिंह यांच्या माहितीनुसार, हे घर पॉलिमर डीलर मनोज पुगलिया यांचे होते.

# नमो शेतकरी योजनेचा हप्ता पुढील आठवड्यात!

प्रतिनिधी १८ मार्च

**मुंबई :** राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी आनंदवार्ता आली आहे. राज्य सरकारने, नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेची अपडेट दिली आहे. त्यानुसार, या योजनेचा ८ वा हप्ता पुढील आठवड्यात थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. याविषयीचा शासन निर्णय आला आहे. या हप्त्यासाठी सरकारने १,७७४ कोटींचा निधी वितरीत करण्यास मंजुरी दिली आहे. राज्यातील पात्र ९० लाख ३४ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होणार आहे. पीएम किसान योजनेच्या धर्तीवर राज्य सरकारने ही योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी आवश्यक करण्यात आली आहे.

# आरटीई 25 टक्के प्रवेशासाठी अर्जाची 25 मार्चपर्यंत मुदत




## ▶▶ अंतराची अट शिथिल झाल्याने विद्यार्थ्यांना फायदा
## ▶▶ अधिक अंतरावरील शाळा प्रवेशास मज्जाव करता येणार नाही

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला:** आरटीई अंतर्गत ऑनलाइन अर्ज भरण्याची अंतिम तारीख वाढवून आता २५ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती शिक्षण संचालनालयाने दिली आहे. त्यामुळे अद्याप ज्या पालकांनी अर्ज दाखल केले नाही त्यांनी ते दाखल करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

आरटीई कायद्यानुसार खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिलीत २५ टक्के मोफत शिक्षणाची तरतूद आहे. यापूर्वी पालकांना त्यांच्या निवास स्थानापासून १ किलोमीटर अंतरातील शाळांची निवड करण्याची अट होती. मात्र, न्यायालयाने स्पष्ट केले की, जर १ किलोमीटरच्या परिघात शाळा उपलब्ध नसेल, तर विद्यार्थ्यांना अधिक अंतरावरील शाळेत प्रवेश घेण्यास मज्जाव करता येणार नाही. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने अंतराची अट शिथिल करण्याचा निर्णय घेतला असून, आरटीई ऑनलाइन प्रवेश प्रणालीमध्ये आवश्यक बदल करण्यात येत आहेत. त्यामुळे पालकांना आता अधिक अंतरावरील शाळांची निवड करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच, १६ मार्च २०२६ पर्यंत ज्यांनी आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरले आहेत, त्या सर्वांना अर्ज पुन्हा 'कन्फर्म' करण्याची संधी देण्यात आली आहे. पोर्टलवर विशेष पॉपअप विंडोच्या माध्यमातून ही सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे आदेशात नमूद आहे. दरम्यान, या निर्णयामुळे आरटीई प्रवेश प्रक्रियेत पालकांना अधिक पर्याय उपलब्ध होणार असून, विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये प्रवेश मिळविणे अधिक सुलभ होणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे.

# पोलिस प्रशिक्षण केंद्राला कृष्णप्रकाश यांची भेट



प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला:** स्थानिक पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र येथे नुकतेच वार्षिक निरीक्षण पार पडले. राज्याचे अपर पोलीस महासंचालक तथा अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके - अतिरिक्त कार्यभार) कृष्ण प्रकाश यांनी या केंद्राला भेट देऊन कामकाजाचा सखोल आढावा घेतला. यावेळी त्यांनी केंद्रात झालेल्या सकारात्मक बदलांचे आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांचे विशेष कौतुक केले.

निरीक्षणादरम्यान, कृष्ण प्रकाश यांनी नमूद केले की, निधी आणि संसाधनांची कमतरता असूनही, प्रशिक्षण केंद्राच्या दर्जात कमालीची सुधारणा झाली आहे. 'केवळ संसाधने उपलब्ध असून चालत नाही, तर ती प्रभावीपणे राबवण्यासाठी नाविन्यपूर्ण कल्पना आणि दृढनिश्चयाची जोड लागते, हे या केंद्राने सिद्ध करून दाखवले आहे,' असे गौरवोद्गार त्यांनी काढले. या परिवर्तनाचे श्रेय त्यांनी केंद्राचे प्राचार्य (पोलीस अधीक्षक) डॉ. निलेश पांडे आणि त्यांच्या टीमला दिले. यामध्ये इनडोअर डायरेक्टर डीवायएसपी पूनम पाटील आणि आउटडोअर डायरेक्टर डीवायएसपी मनीष पाटील यांच्या समर्पित कामाचा त्यांनी विशेष उल्लेख केला.

# राज्य सरकारचे शिक्षक बदली धोरण फेकले कचऱ्यात

## डेप्युटी सीईओ, शिक्षणाधिकाऱ्यांना वाचविणारा कोण

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला:** राज्य शासनाच्या शिक्षक बदली धोरणाला पाने पुसत अकोला जिल्हा परिषदेत कोट्यावधीचा मलिदा घेत २६८ शिक्षकांच्या बदल्या आता अडचणीत आल्या आहे. दिव्यांग नसलेल्यांना खोटे प्रमाणपत्राच्या आधारे केलेल्या बदल्या. विधवा, घटस्फोटीत नसलेल्या शिक्षकांच्या बदल्या आता चर्चेचा विषय ठरला आहे. प्रत्येक बदलीसाठी दोन लाख घेणारे कोण ? अशी विचारणा आता जिल्हा परिषदेत सुरु झाली आहे. अशाच प्रकारचा घोटाळा हा शालार्थ आय डी मध्ये तर नाही ना याची खातरजमा सीईओ यांनी करण्याची गरज आहे.




राज्य शासनाच्या शिक्षक बदली धोरणाचे परिपत्रक कचऱ्यात फेकत जिल्हा परिषदेत शिक्षकांच्या बदलीचा महाघोटाळा झाला आहे. या घोटाळ्यात बडे मासे अडकणार असून बदल्या करणाऱ्यामध्ये प्रमुख असलेले उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अनेक विभागाचे चार्ज कसे असा प्रश्न उपस्थित होत आहे. इतक्यावरच हे प्रकरण थांबले नसून जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी यांच्या मंजुरीने या बदल्या झाल्या. त्या बदल्या करताना सर्व नियम धाब्यावर बसविले गेले. दिव्यांगाचे खोटे प्रमाणपत्र जोडत मोठ्या प्रमाणात बदल्या केल्या गेल्या. इतक्यावरच हे प्रकरण थांबले नाही तर ज्या महिला शिक्षका या विधवा, घटस्फोटीत नाही त्यांना थेट विधवा व घटस्फोटीत दाखविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एका बदलीसाठी दोन लाखांचा रेट होता त्यानुसार किती मलिदा कोणी जमा केला अशी विचारणा आता होत आहे. दरम्यान, शिक्षक बदली घोटाळ्यात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एका गट शिक्षणाधिकाऱ्यासह पाच जणांचे निलंबन केल्याची माहिती जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिली आहे.

### तुर्तास चौकशी सुरु दोषींवर कारवाई होणार - अनिता मेश्राम

शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित पंचायत समितींच्या गटविकास अधिकाऱ्यांना त्रिस्तरीय स्वतंत्र चौकशी समिती त्यानुसार स्थापन करण्याचे निर्देश दिले आहे. या प्रकरणी बाळापूरचे विस्तार अधिकारी (शिक्षण) तथा प्रभारी गट शिक्षणाधिकारी दिनेश दुतंडे, निमकरदा येथील सहाय्यक शिक्षक श्रीकांत वानखडे, वाडेगाव येथील सहाय्यक शिक्षक हमीद हुसेन लियाकत हुसेन, अकोट येथील सहाय्यक शिक्षक ज्ञानेश्वर भोयर तसेच अकोला येथील सहाय्यक शिक्षक राजेंद्र पुंजाजी ताडे यांच्यावर सदरची कारवाई करण्यात आल्याची प्रतिक्रिया जिल्हा परिषद च्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी दिली आहे. निलंबनाच्या या कारवाईमुळे शिक्षण विभागात मोठी खळबळ उडाली आहे. 'अद्यापही या प्रकरणाची चौकशी पूर्ण झालेली नाही. आमचे पथक प्रत्येक संशयास्पद प्रमाणपत्राची पडताळणी करत आहे. तपासादरम्यान आणखी कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कायदेशीर आणि प्रशासकीय कारवाई केली जाईल,' असा स्पष्ट इशारा सीईओ अनिता मेश्राम यांनी दिला आहे.

# पोलिसांनी या अड्ड्यांवर कडक कारवाई करावी

## दारू विक्रीत सामील असलेल्या लोकांवर कठोर कारवाई करा

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला:** अकोल्याच्या शिवनी परिसरातील राहुल नगर येथे सुरू असलेल्या अवैध दारूविक्री विरोधात मंगळवारी ग्रामस्थांचा संताप पाहायला मिळाला. राहुल नगरमधील शेकडो महिलांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यावर धडक दिली आणि अवैध दारूविक्री तातडीने बंद करण्याची मागणी करत ठाणे प्रमुखांना निवेदन सादर केले.

शिवनीच्या राहुल नगरमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून देशी, विदेशी आणि हातभट्टीची कच्ची दारू उघडपणे विकली जात आहे. त्यांच्या माहितीनुसार, परिसरात ३ ते ४ ठिकाणी हे अवैध अड्डे सुरू असून, यामुळे सामाजिक वातावरण पूर्णपणे बिघडले आहे. दारूमुळे परिसरात दररोज होणारी भांडणे, शिवीगाळ आणि वादाच्या घटनांमुळे महिला आणि कुटुंबांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही प्रतिष्ठित व्यक्तींचे संरक्षण या दारू विक्रेत्यांना लाभले असल्यामुळेच हा व्यवसाय निर्धास्तपणे सुरू असल्याचा गंभीर आरोपही महिलांनी केला आहे. पोलीस ठाण्यात मोठ्या संख्येने पोहोचलेल्या महिलांनी आपल्या व्यथा मांडताना सांगितले की, दारूमुळे कुटुंबात तणाव वाढत असून अनेक घरांची आर्थिक स्थिती खालावली आहे. कष्टकरी आणि मजूर आपली कमाई दारूवर खर्च करत असल्याने घराचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे.

CLASSIFIED

प्लॉट प्लॉट प्लॉट

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट

पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8263923606
7757905649

१००% नौकरी

नागपुर, अमरावती मध्ये ऑफिस व एमआयडीसी फॅक्टरीमध्ये १० वी १२ वी, आयटीआय (ऑल ट्रेड) ते पदवीधर पास/नापास मुला/मुलींची भरती. पगार १५००० ते २२००० पर्यंत

शुभम सर

मो. 7350860805
7350713647

CMYK CMYK



# त्या पाच व्यापारी संकुलाचा निर्णय स्थगित; खाऊ गल्ली प्रस्तावाला मंजुरी

प्रतिनिधी १८ मार्च

**अमरावती :** शासनाची अधिसूचना आणि स्थापित समितीमार्फत निर्धारित केलेल्या बीओटी तत्त्वावरील चार, तर एक नॉन-बीओटी अशा पाच व्यापारी संकुलांच्या लीजचे नूतनीकरण आणि भाडे निर्धारणाच्या विषयाला स्थगिती देण्यात आली. तसेच शहरात नव्याने खाऊ गल्ली फूड पार्क साकारण्याच्या विषयाला मंजूरी प्रदान करण्याचा निर्णय महापालिका सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. उत्पन्नवाढीच्या अनुषंगाने सभागृहातील सदस्यांच्या भावना लक्षात घेता पीठासीन सभापती महापौर श्रीचंद तेजवानी यांनी तसा निर्णय जाहीर केला.



मंगळवार, १७ मार्च रोजी आयोजित सर्वसाधारण सभेचे पीठासीन सभापती महापौर श्रीचंद तेजवानी होते. यावेळी उपमहापौर सचिन भेंडे, आयुक्त सौम्या शर्मा, नगरसचित संदीप वहूरकर यांनी कामकाजात सहभाग नोंदविला. दरम्यान, प्रशासकीय विषय क्रमांक १० अन्वये ६ नोव्हेंबर २०२३ रोजीचे शासन अधिसूचना (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्यावर हस्तांतरण आणि भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण) नियम २०२३ मधील नमूद समितीमार्फत निर्धारित केलेल्या दरास मंजुरी प्रदान करण्याचा विषय सभागृहात मांडला गेला. मात्र या विषयावर सत्तापक्ष विरोधी पक्षानेही महापालिकेच्या उत्पन्नवाढीच्या बाजूने भूमिका मांडली; तर काँग्रेसचे विरोधी पक्षनेता विलास ईगोले, मिलिंद चिमोटे, अनिल अग्रवाल, धीरज हिवसे यांच्यासह भाजपचे पक्षनेता चेतन गावंडे, अॅड. प्रशांत देशपांडे, राष्ट्रवादी (अजित पवार) वे स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, मंगेश मनोहरे, मनीष बजाज, चंदू खेडकर, भोजराज काळे, युता स्वाभिमानचे प्रशांत वानखडे, शिंदेसेनेचे डॉ. राजेंद्र तायडे, स्नेहा लुल्ला, 'एमआयएम'चे गटनेता शेख हमीद, आदींनी चर्चेत सहभाग घेताना महापालिकेचे उत्पन्नवाढीसाठी ठोस पाऊल उचलले गेले पाहिजे, अशी भूमिका मांडली. या विषयावर प्रचंड चर्चा झाली. अखेर या पाच व्यापारी संकुलांच्या लीजचे नूतनीकरण आणि भाडे निर्धारणाच्या विषयाला स्थगिती देताना महापालिका उत्पन्नवाढीच्या अनुषंगाने नवीन प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी आणण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. राज्य दरम्यान, एलईडी पथदिवे देखभाल-दुरुस्ती आणि नवीन एलईडी लाइट्स पुरवठा करण्याबाबतचा शासनाकडून आलेला विषय आर्थिकदृष्ट्वा परवडणारा नाही. त्यामुळे शासनाने १० वर्षांसाठी त्याकरिता अनुदान द्यावे, असा निर्णय घेत सभागृहाने हा प्रस्ताव फेटाळला.

### विकासकासोबतचा करारनामा संपला : चिमोटे

महापालिकेने ३० वर्षांसाठी बीओटी तत्त्वावर चार व्यापारी संकुले ही विकासकांना उभारणीसाठी दिली होती. हा करारनामा संपला असून आता महापालिका मालक आहे. या संकुलाबाबत काय करायचे? याचा निर्णया सभागृहाला घ्यावा लागणार आहे. काँग्रेस व्यापाऱ्यांच्या विरोधात नाही; पणा महापालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता उत्पन्नवाढीसाठी ठोस निर्णय घ्यावा लागेल, अशी भूमिका काँग्रेसचे सदस्य मिलिंद चिमोटे यांनी रोखठेकपणे मांडली.

### चार बीओटी आणि एक नॉन-बीओटी संकुल

जयस्तंभ चौकस्थित प्रियदर्शिनी इंदिरा गांधी, महापालिका मुख्यालयानजीक दादासाहेब खापर्डे, सूरज बिल्डर्स आणि जवाहर गेट बीओटी तत्त्वावरील चार व्यापारी संकुले तसेच श्याम चौकस्थित सुभाषचंद्र बोस नॉन-बीओटी व्यापारी संकुल अशी एकूण पाच व्यापारी संकुलांच्या लीजचे नूतनीकरण आणि भाडे निर्धारणाचा विषय गत सात वर्षापासून प्रलंबित आहे.

# जिल्हा नियोजनचा निधी 25 मार्चपूर्वी खर्च करावा -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी १८ मार्च

**अमरावती:** जिल्हा नियोजन व विकास समितीमधील संपूर्ण निधीचे वितरण करण्यात आले आहे. तसेच आवश्यक असलेल्या सर्व मान्यता देण्यात आल्या आहे. त्यामुळे यंत्रणांनी २५ मार्चपूर्वी निधी खर्च करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हा नियोजनच्या खर्चाबाबत अंतिम बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपवनसंरक्षक अर्जूना के. आर., जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, जिल्हा कोषागार अधिकारी शिल्पा पवार यांच्यासह कार्यान्वयन यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी येरेकर यांनी यावर्षीच्या जिल्हा वार्षिकच्या निधीमधून एकही रूपया परत करू नये.

व्यपगत होणारा निधी तातडीने जिल्हा नियोजनला कळविण्यात यावा. तसेच हा निधी परत करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच यंत्रणांना निधीची आवश्यकता असल्यास त्याची माहिती सर्व मान्यतासह सादर करण्यात यावी. या कामांच्या गरजेनुसार निधी देण्यात येईल. जिल्हा वार्षिकच्या जिल्ह्यातील कामांना २५ मार्चची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे खर्चाबाबत सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी. यंत्रणांनी कामे पूर्ण केली असल्यास देयके तातडीने कोषागारामधून आहरित करण्यात यावी.

# पिडीएमसी हॉस्पिटलसमोरून चोरी गेलेली दुचाकी २४ तासांत शोधली; गाडगेनगर पोलिसांकडून आरोपी अटक

प्रतिनिधी १८ मार्च

**अमरावती :** पोलीस स्टेशन गाडगेनगर हद्दीत मोटरसायकल चोरीचा गुन्हा जलद गतीने उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. फिर्यादी जिवन विलासराव धांडे (वय ३४, रा. साखरी ता. अंजनगाव सुर्जि, जि. अमरावती) हे १६ मार्च २०२६ रोजी आपल्या आईला उपचारासाठी पिडीएमसी हॉस्पिटल येथे घेऊन आले होते. त्यांनी आपली दुचाकी (क्र. एमएच ३२ डब्ल्यु ५२६९) हॉस्पिटलच्या गेटबाहेर पार्क केली होती.



उपचार करून परत आल्यानंतर त्यांना मोटरसायकल जागेवर दिसली नाही. यानंतर त्यांनी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून अप.क्र. २७२/२०२६ कलम ३०५ (ब) भा.न्या.सं. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

या गुन्ह्याचा तपास करत असताना गाडगेनगर पोलीसांच्या डी.बी. पथकाने सहकार नगर चौक ते प्रविणनगर मार्गावर संशयित हालचाली करणाऱ्या उदय चंदु भोंबे (वय २४, रा. ब्राम्हणवाडा गोविंदपुर, अमरावती) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीस गेलेली हिरो पेंशन प्रो मोटरसायकल (क्र. एमएच ३२ डब्ल्यु ५२६९) किंमत अंदाजे ३२,००० रुपये जप्त करण्यात आली.

ही कारवाई . पोलीस आयुक्त राकेश ओला, . पोलीस उपआयुक्त गणेश शिंदे, सहा. पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे, वपोनि. गोरखनाथ जाधव, काईम पोनि. विजया पंधरे मॅडम व प्रशासन पोनि. समाधान वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

सदर कामगिरी पो.स्टे. गाडगेनगर डी.बी. पथक प्रमुख सपोनि. मनोजकुमार मानकर, सफौ. प्रकाश मेश्राम, पोहवा. निलेश जुनघरे, अमोल यादव, नपोका. विनोद मालवे, पोशि. सिध्दार्थ शृंगारे व सचिन गौरखेडे यांनी संयुक्तरित्या पार पाडली.



आमदार रवि राणा आश्वासन समिती प्रमुख यांनी समिती प्रमुख झाल्या पासून आत्ता पर्यंत च्या समितीच्या कारकिर्दीत रेकॉर्ड ब्रेक सर्वात जास्त आश्वासणे मार्गी लावत निकालात काढत विधानसभेच्या आमदारांनी मांडलेल्या प्रश्नांना न्याय दिला आणि मंत्र्यांनी दिलेल्या ५९१ आश्वासनाची पूर्तता करून त्या संदर्भातील समितीचा अहवाल विधानसभे च्या पाटलावर ठेवणार आहे त्या संदर्भात विधानसभा अध्यक्षानी समिती प्रमुख आमदार रवि राणा यांचे अभिनंदन केले.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीतील ५१ विद्यार्थ्यांची 'सेडेमॅक मेकाट्रॉनिक्स लिमिटेड' मध्ये निवड

प्रतिनिधी १८ मार्च

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील कोअर विभागात अंतिम वर्षाला शिकत असलेल्या ५१ विद्यार्थ्यांची 'सेडेमॅक मेकाट्रॉनिक्स लिमिटेड' या प्रतिष्ठित कंपनीत महाविद्यालयातील कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड झाली आहे. 'सेडेमॅक मेकाट्रॉनिक्स लिमिटेड' ही नामांकित कंपनी ऑटोमोबाईल आणि औद्योगिक क्षेत्रासाठी अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक कंट्रोल युनिट्स विकसित करणारी संशोधनकेंद्रित कंपनी, ही कंपनी ऑटोमोबाईल (दुचाकी व तिनचाकी) तसेच औद्योगिक क्षेत्रासाठी



अत्यावश्यक असलेल्या इलेक्ट्रॉनिक कंट्रोल युनिट्स (ECUs) चे संशोधन, डिझाईन व उत्पादन करणारी संशोधनकेंद्रित संस्था आहे. कंपनीच्या प्रमुख उत्पादनांमध्ये इंटिग्रेटेड स्टार्टर जनरेटर (ISG) तसेच फ्युएल इंजेक्शन सिस्टिम्स यांचा समावेश आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ३१ विद्यार्थी इलेक्ट्रिकल इंजीनिअरिंग विभाग व २० विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्यूनीकेशन इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या यशाबद्दल विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाचे मार्गदर्शन, प्रकल्प आधारित शिक्षण, आणि उत्कृष्ट तांत्रिक प्रशिक्षणाला श्रेय दिले आहे. कंपनीच्या निवड प्रक्रियेतून यशस्वी होऊन, विद्यार्थ्यांनी 'सेडेमॅक मेकाट्रॉनिक्स लिमिटेड' मध्ये काम करण्याचा उत्साह व्यक्त केला आहे. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ पी. एम. जावांधिया, कॉर्पोरेट रिलेशन डीन प्रा. मोनिका जैन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्लेसमेंट कोऑर्डिनेटर प्रा. अनिकेत पावडे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्लेसमेंट कोऑर्डिनेटर प्रा. सचिन जळीत यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# केंद्र प्रमुख मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेच्या पात्र उमेदवारांना माहिती सादर करण्यासाठी २१ मार्चपर्यंतची मुदत

प्रतिनिधी १८ मार्च

**अमरावती :** केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी/सीटीईटी) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी सर्वात पहिली परीक्षा उत्तीर्ण झाल्याची माहिती वेबसाईटवर सादर करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदने प्रसिद्धी निवेदनाद्वारे केले आहे. त्याचप्रमाणे या परीक्षेची गुणपडताळणी ऑनलाईन उपलब्ध करण्यात आली असून, दोन्ही प्रक्रिया उमेदवारांना विशिष्ट मुदतीत पूर्ण करावयाच्या आहेत.महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील सर्व जिल्हा परिषद शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी 'समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०२५'चे ऑनलाईन पद्धतीने तीन सत्रात आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेचा निकाल १३ मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे.

परीक्षेत पात्र उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची प्रक्रिया निवेदनाद्वारे स्पष्ट करण्यात आली असून, त्यानुसार महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी सर्वात पहिली परीक्षा उत्तीर्ण झाल्याची माहिती प्ज्ः//सेमज्ल्हा.ग्ह/ूर्द्ते/ख्झ२०२६ष्र्हर्दि.ॅर्ज या लिंकवर १६ ते २१ मार्च यादरम्यान भरावयाची आहे. ही माहिती केवळ नमूद लिंकमध्येच भरायची असून, ई-मेल, पत्राद्वारे किंवा इतर माध्यमाद्वारे सादर केलेली माहिती ग्राह्य धरण्यात येणार नाही, असे निवेदनात म्हटले आहे. यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, असेही निवेदनात स्पष्ट केले आहे. या परीक्षेची गुणपडताळणी/रिस्पॉन्स शीट ही १६ ते ३१ मार्च पर्यंत https://mscepune.in/DTEDOLA/KP2026ResponseSheet.aspx या लिंकवर उपलब्ध आहे.

## सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# युगधर्म पब्लिक स्कूल, खामगावला महाराष्ट्र शासनाचा क्रीडा पुरस्कार

प्रतिनिधी १८ मार्च

**खामगाव :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांसाठी वय वर्षे १४ व १७ या गटांमध्ये मुला-मुलींसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धांमध्ये स्थानिक युगधर्म पब्लिक स्कूल, खामगाव येथील विद्यार्थ्यांनी वय १४ व १७ या गटांमध्ये विविध क्रीडा प्रकारात सहभाग घेऊन जिल्हास्तर, विभागीय स्तर तसेच राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने युगधर्म पब्लिक स्कूल, खामगाव या शाळेला महाराष्ट्र शासनाचा क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. महानाकर यांच्या हस्ते शाळेचे अध्यक्ष माननीय श्री. गोपालजी अग्रवाल यांना प्रदान करण्यात आला.



यावेळी आयोजित अभिनंदन कार्यक्रमात अध्यक्ष श्री. गोपालजी अग्रवाल यांनी सांगितले की, युगधर्म पब्लिक स्कूल, खामगाव येथे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्याबरोबरच त्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासावरही विशेष भर दिला जातो. विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव मिळावा यासाठी शाळेमध्ये विविध ऐच्छिक क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होण्याची संधी व योग्य मार्गदर्शन दिले जाते. खामगावातील प्रत्येक विद्यार्थी आपल्या आवडीच्या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचावा, हा शाळेचा प्रयत्न आहे. क्रीडा क्षेत्रातील या यशाचा विद्यार्थ्यांना भविष्यातही लाभ होत असून शासनाच्या नोकऱ्यांमध्ये मिळणारा ५ टक्के क्रीडा राखीव कोटा, तसेच अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेत मिळणाऱ्या क्रीडा कोट्याचा विद्यार्थ्यांना फायदा होऊ शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

शाळेच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे, शाळेचे प्राचार्य श्री. ए. बी. अवचार व सर्व शिक्षकांचे कौतुक केले. यावेळी शाळेचे प्राचार्य श्री. ए. बी. अवचार यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच शाळेचे अध्यक्ष यांचे आभार व्यक्त केले.शाळेच्या राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा यशामुळे पालकांचा शाळेत प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणावर ओघ वाढत असून, युगधर्म पब्लिक स्कूल, खामगाव ही शाळा खामगाव शहरासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना पालक व विद्यार्थी व्यक्त करत आहेत. त्यामुळेच ही शाळा क्रीडा क्षेत्रासाठी प्रथम पसंतीची शाळा ठरत आहे.

सध्या शाळेमध्ये ३ ते १० वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले

## अण्णाभाऊ साठेंचा पुतळा बसविल्याने तणाव

# पर्यायी जागेसाठी समाजबांधवाची ठाम भूमिका




प्रतिनिधी १८ मार्च

**खामगाव :** स्थानिक रेल्वस्टेशन जवळील वस्तीतील सरकारी जागेत साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा अनधिकृत पुतळा बसविल्याचे १७मार्च रोजी उघडकीस आले आहे.

स्थानिक रेल्वेस्टेशनला लागून असलेल्या वस्तीमध्ये १६ मार्च रोजी रात्री अज्ञात इसमांनी साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा अर्धकृती पुतळा बसविला. हा प्रकार पहाटे उघडकीस आल्याने न. प. चे अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्यासह महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थही धाव घेतली. जोपर्यंत पुतळ्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून दिल्या जात नाही. तोपर्यंत पुतळा हटवू नये, अशी भूमिका समाज बांधवानी घेतली. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे कायदा व सव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होउ नये म्हणून मोठा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. यावेळी समाजबांधवासोबत चर्चेसाठी तहसिलदार सुनिल पाटील, मुख्याधिकारी प्रशांत शेळके, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील, ठाणेदार रामकृष्ण पवार, सुरेंद्र अहिरकार उपस्थित होते

**ग्राम पंचायत कार्यालय, वाडेगाव**

ता. बाळापुर, जि. अकोला, पिन ४४४ ५०२

**आठवडी बाजार हर्राशीची जाहिर सुचना**

ग्रामपंचायत कार्यालय वाडेगांव ता. बाळापुर जि. अकोला सर्वत्र जनतेस या जाहिर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, वाडेगांव ग्रामपंचायतच्या मालकीचा आठवडी बाजार फि वसुलीचा ठेका व जनावर विक्री नोंदणी फि वसुलीचा ठेका सन २०२६-२०२७ या वर्षा करीता दिनांक ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ या कालावधी करीता दिनांक २३/०३/२०२६ रोज सोमवारला दुपारी ठिक २,०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय वाडेगांव येथे जाहिर लिलावाने हर्रास करण्यात येणार आहे.

तरी हर्रास घेवु ईच्छिणाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, हर्रासीत बोली बोलणाऱ्यांनी,बोली बोलण्यापुर्वी भाजी बाजार वसुली फि करीता रूपये १५०००/- अनामत नगदी भरावी लागेल आणि जनावर विक्री नोंदणी फि वसुली करीता अनामत रक्कम रूपये १०,०००/- नगदी भरावी लागेल. त्या शिवाय बोली बोलता येणार नाही, हर्रास कायम झाल्यानंतर हर्राशीची पुर्ण रक्कम त्याच वेळेस त्या दिवशी नगदी भरावी लागेल. त्यासाठी वेळ दिल्या जाणार नाही याची संबंधीत ठेकेदारांनी नोंद घ्यावी.

हर्रास बाबतच्या नियम व अटी ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील तसेच नोटीस बोर्डावर लावण्यात आलेल्या आहेत.

**टिप :** हर्राशीची योग्य किंमत न आल्यास हर्रास कायम करणे किंवा रद्द करणे बाबतचा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे.

**विनीत**

**वाय. टी. कापकर** ग्रामपंचायत अधिकारी

**मंगेश शा. तायडे** प्रशासक ग्रा. पं. वाडेगाव

**तथा सर्व सन्माननीय प्रशासकीय समिती सदस्य, सदस्या ग्रा.पं. वाडेगाव**

सिटी न्यूज अकोला
बुधवार, दि. १८ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अनोळखी इसमाची ओळख पटविण्याचे आवाहन

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला :** सिटी कोतवाली पोलिस स्टेशनांतर्गत येणाऱ्या खुले नाट्यगृह परिसरात एक अनोळखी इसम १६ मार्च रोजी दुपारच्या सुमारास बेशुद्धावस्थेत आढळून आला होता. पोकॉ रोहित सोनोने यांनी उपचारार्थ दाखल केले असता तो उपचारादरम्यान मरण पावला. या इसमासोबत कोणीच नसून तो लावारीस बेघर भिकारी स्थितीत मिळून आला. त्यामुळे त्याच्या नातेवाईकाचा शोध घेण्यात येत आहे. सदर इसम अंदाजे ६२ वर्षाचा असून, उंची ५ फूट ३ इंच, बांधा सडपातळ, रंग काळा सावळा, चेहरा लांबट, केस काळे पांढरे, दात पडलेले, अंगात हिरव्या बारीक चौकटीचा शर्ट, भुरकट रंगाचा मळलेला पॅन्ट असे वर्णनाच्या इसमाची ओळख पटल्यास सिटी कोतवाली पोलिस स्टेशनशी संपर्क साधावा.

## जिल्ह्यात एलपीजी गॅसची आवक नियमित

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला :** जिल्ह्यात एलपीजी गॅसची नियमित आवक होत आहे. एलपीजी सिलेंडरची जिल्ह्यात रोज आवक असल्याने पुरवठा सुरळीत होत आहे. आजही आवक झाल्याने साठा वाढला आहे. मंगळवारीही आवक झाल्याने उपलब्ध साठ्यात सुधारणा झाली आहे. आजमितीला १५ हजार ५०३ सिलेंडर साठा उपलब्धता आहे. त्याचप्रमाणे, आवक नियमित सुरू आहे. पुरवठा सुरळीत राहण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न होत आहेत. गैरप्रकार रोखण्यासाठी नऊ पथके गठित करण्यात आली असून, आवश्यक कार्यवाहीला गती देण्यात आली आहे, अशी माहिती पुरवठा कार्यालयातर्फे देण्यात आली.

## स्वाधार योजनेच्या अर्जातील त्रुटीची पूर्तता करून घ्यावी


**अकोला :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेत होस्टेल मॅनेजमेंट संकेतस्थळावर अर्ज सादर केलेल्या अर्जांची पडताळणी सुरु आहे. तथापि, अर्जांत त्रुटी आढळून येत असून, विद्यार्थ्यांनी २५ मार्चपूर्वी पूर्तता करून घ्यावी, असे आवाहन समाजकल्याण कार्यालयाने केले आहे. आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे, गुणपत्रिका न जोडणे किंवा अनुत्तीर्ण असणे, जुनी कागदत्रे जोडणे अशा त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी लॉगिनवर अर्जाची स्थिती पाहुन जर अर्ज सेंड बॅक त्रृटीत असेल तर तत्काळ दुरुस्ती करुन अर्ज सादर करावा.

## अनोळखी व्यक्तीची ओळख पटवण्याचे आवाहन

**अकोला :** मोठ्या पुलाजवळ १५ मार्च रोजी एका ४५ वर्षीय व्यक्ती आढळला होता. उपचारा दरम्यान शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १६ रोजी त्यांचा मृत्यू झाला. तेव्हा पासून त्यांचा मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या शवागारात ठेवला आहे. या व्यक्तीची उंची १७२ इंच, वय अंदाजे ४५, डोक्याचे केस काळे पांढरे, रंग सावळा, चेहरा गोल, दाढी काळी पांढरी तसेच उजव्या हातावर राजू असे नाव तसेच हनुमानाचे चित्र गोंदवले आहे. अंगात पिवळ्या रंगाच टी शर्ट आणि भुरकट रंगाची पँट घातली आहे. या व्यक्ती बाबतीत माहिती असल्यास सिटी कोतवाली पोलिस स्टेशनचे निरीक्षक संजय गवई यांचा मोबाईल क्रमांक ९५५२५३४७९६ तसेच हेड कॉन्स्टेबल सोपान डाबेराव यांच्याशी ८८८८९३५४३५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# शब-ए- कद्र निमित्त मशीदीत प्रार्थना, बाजारामध्ये चैतन्य

■ शब-ए-कद्र निमित्त मशिदींमध्ये इबादत आणि बाजारपेठेत चैतन्य : ईदच्या तयारीची लगबग






प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला:** पवित्र रमजान महिन्यातील सर्वात महत्त्वाची आणि बरकतीची मानली जाणारी 'शब-ए-कद्र'ची रात्र अकोला शहरात पूर्ण श्रद्धेने, प्रार्थनेने आणि उत्साहात साजरी केली जात आहे. या मुबारक रात्रीच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व मशिदींमध्ये विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. रात्रभर नमाज, कुराण पठण, झिक्र आणि दुआ यांचा सिलसिला सुरू आहे. मोठ्या संख्येने रोजेदार आणि नमाजी मशिदींमध्ये पोहोचून इबादतमध्ये मग्न असल्याचे दिसून येत आहे. शब-ए-कद्र ही रात्र हजार महिन्यांपेक्षा उत्तम मानली जाते, त्यामुळे या रात्रीचे महत्त्व लक्षात घेऊन लोक उशिरापर्यंत प्रार्थना करतात. अकोला येथील प्रमुख मशिदींमध्ये तरावीह, नफ्ल नमाज आणि कुराण पठणामुळे आध्यात्मिक वातावरण पाहायला मिळत आहे. नमाजांनंतर देशात शांतता, सुख-समृद्धी आणि मानवतेच्या कल्याणासाठी विशेष प्रार्थना (दुआ) करण्यात आली. पवित्र रमजान महिन्याचे आता शेवटचे काही दिवस उरले असून, आगामी शुक्रवार किंवा शनिवारी ईद-उल-फितर साजरी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अशा परिस्थितीत शहरात रमजान ईदची तयारी जोरात सुरू झाली आहे. मुस्लिम बांधव मोठ्या उत्साहात खरेदीमध्ये व्यस्त आहेत. कोणी कपड्यांची खरेदी करत आहे, तर कोणी पादत्राणे आणि घरगुती वस्तूंच्या खरेदीत मग्न आहे. दुसरीकडे, शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्येही या मुबारक रात्रीची वेगळीच रौनक पाहायला मिळत आहे. विशेषतः मोहम्मद अली चौक परिसरात उशिरापर्यंत लोकांची वर्दळ आहे. कपडे, टोपी, अत्तर, खजूर, मिठाई आणि इफ्तार-सहरीशी संबंधित वस्तूंच्या दुकानांवर ग्राहकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. मुले, तरुण आणि वृद्ध सर्वच जण उत्साहाने खरेदी करताना दिसत आहेत. ईदचा खास पदार्थ असलेल्या 'शीरखुरमा'साठी लागणारे ड्राय फ्रूट्स—काजू, बदाम, खोबरे, अक्रोड, चारोळी आणि अंजीर यांसारख्या पदार्थांचीही मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात आहे. मात्र, सध्या ड्राय फ्रूट्सचे वाढलेले दर सर्वसामान्यांच्या खिशाला जड जात आहेत. व्यापारी अलीम भाई यांच्या मते, 'यावेळी किमती गगनाला भिडल्या आहेत, त्यामुळे ग्राहकांची संख्या मोठी असली तरी खरेदीच्या प्रमाणात काहीशी घट पाहायला मिळत आहे.' रोजेदारांच्या घरांमध्येही सहरी आणि इफ्तारची तयारी जोरात सुरू आहे. लोक बाजारातून जीवनावश्यक वस्तू खरेदी करून घरी परतताना दिसत आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही शब-ए-कद्रच्या निमित्ताने बाजारपेठेत चांगलीच रौनक असल्याचे दुकानदारांचे म्हणणे आहे. एकूणच, अकोला शहरात शब-ए-कद्रची रात्र प्रार्थना, दुआ आणि आनंदाच्या वातावरणात साजरी होत आहे. मशिदींमधील प्रार्थनेचे तेज आणि बाजारपेठेतील चैतन्य शहराचे वातावरण खास बनवत आहे, तर रमजान ईदच्या तयारीने या उत्साहात अधिकच भर घातली आहे.

# मतदार यादी शुद्धीकरण विशेष पुनरिक्षण मोहिमेची पूर्वतयारी

वि.प्रतिनिधी १८ मार्च

**अकोट :** मतदार यादी शुद्धीकरणासाठी अकोट विधानसभा मतदारसंघात पूर्वतयारी सुरू झाली आहे.


या मोहिमेचा उद्देश मतदार यादीतील मृत व दुबार नावे वगळणे तसेच मतदारांच्या तपशीलात आवश्यक दुरुस्ती करून मतदार यादी १०० टक्के अचूक व अद्ययावत करणे हा आहे. याच अनुषंगाने २८ - अकोट विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडून सध्या २९ ऑक्टोबर २०२४ च्या मतदार यादीचे सन २००२ च्या मतदार यादीसोबत मॅपिंग करण्याचे काम सुरू आहे. या प्रक्रियेदरम्यान बीएलओ मोबाईलद्वारे संपर्क साधत असून काही ठिकाणी घरोघरी भेट देऊन मतदारांकडून आवश्यक माहिती संकलित करत आहेत.

विशेषतः ज्या मतदारांचे सध्याचे वय ४० वर्षे किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा मतदारांना त्यांच्या वडील, आई, आजोबा किंवा आजी यांच्या सन २००२ मधील मतदार यादीतील नोंदीचा अनुक्रमांक देणे आवश्यक ठरत आहे. प्रशासनाच्या वतीने सर्व मतदारांना आवाहन करण्यात आले आहे की, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना आवश्यक ती माहिती वेळेत देऊन सहकार्य करावे. यामुळे आगामी कार्यक्रमा दरम्यान होणारी धावपळ टाळता येईल आणि मतदार यादी अधिक अचूक करण्यात मदत होईल.

# रमजान ईद (ईद-उल-फितर) : चंद्र दर्शनानंतरच का साजरी केली जाते आणि याचे महत्व काय

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला :** इस्लाम धर्मात रमजान महिना अत्यंत पवित्र मानला जातो. या संपूर्ण महिन्यात मुस्लिम बांधव रोजा (उपवास) ठेवतात, नमाज अदा करतात आणि अल्लाहची भक्ती करतात. रमजान महिना संपल्यानंतर ईद-उल-फितर हा सण साजरा केला जातो, ज्याला सर्वसाधारणपणे रमजान ईद असे म्हणतात. जर १९ मार्च रोजी शव्वालचा चंद्र दिसला, तर ईद २० मार्चला साजरी केली जाईल. आणि जर चंद्र दिसला नाही, तर ईद २१ मार्चला साजरी केली जाईल. ईद हा सण आनंद, बंधुता आणि मानवतेचे प्रतीक आहे. रमजान महिनाभर रोजा ठेवल्यानंतर जेव्हा नवीन चंद्र दिसतो, तेव्हा तो रमजान संपल्याचा आणि शव्वाल महिना सुरू झाल्याचा संकेत असतो. या आनंदात दुसऱ्या दिवशी ईद-उल-फितर साजरी केली जाते. इस्लामिक दिनदर्शिका ही चंद्रावर आधारित असल्यामुळे ईदची तारीख चंद्रदर्शनावर ठरते असे जावेद जकारिया यांनी सांगितले.



ईद-उल-फितरचा अर्थ 'रोजा सोडण्याचा सण' असा होतो. रमजान महिन्यात मुस्लिम बांधव उपवास, संयम आणि आत्मशुद्धी पाळतात. महिन्याच्या शेवटी अल्लाहचे आभार मानण्यासाठी हा सण साजरा केला जातो. ईदपूर्वी प्रत्येक मुस्लिमाने गरजू लोकांना 'सदका-ए-फित्र' किंवा 'फित्रा' देणे आवश्यक मानले जाते, जेणेकरून गरीब आणि गरजू लोकही ईदच्या आनंदात सहभागी होऊ शकतील. या परंपरेतून समाजात समानता, सहकार्य आणि मानवतेचा संदेश दिला जातो. ईदच्या दिवशी सकाळी विशेष नमाज अदा केली जाते, ज्याला ईदची नमाज म्हणतात. ही नमाज ईदगाह किंवा मशिदीत सामूहिकरित्या अदा केली जाते. नमाजपूर्वी गुस्ल (अंघोळ) केली जाते, स्वच्छ आणि चांगले कपडे परिधान केले जातात, अत्तर लावले जाते आणि काहीतरी गोड खाऊन ईदगाहकडे प्रस्थान केले जाते. ईदची नमाज दोन रकाअतांची असते, ज्यामध्ये अतिरिक्त तकबीर म्हटल्या जातात. नमाजानंतर इमाम खुतबा देतात आणि समाजात प्रेम, बंधुता आणि सेवाभाव यांचा संदेश देतात. यानंतर लोक एकमेकांना भेटून 'ईद मुबारक' म्हणतात, गळाभेट घेतात आणि आनंद साजरा करतात. घरांमध्ये सेवई आणि विविध मिठाया बनवल्या जातात आणि नातेवाईक, मित्र आणि शेजाऱ्यांसोबत वाटल्या जातात.

# ईद-उल-फितर निमित्त बाजारपेठेत वाढली गर्दी ; महागाई असूनही खरेदीला उत्साह

प्रतिनिधी १८ मार्च

**आलेगाव :** ईद-उल-फितर सण जवळ येताच आलेगाव शहरातील बाजारपेठांमध्ये मोठी लगबग आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ईदसाठी अवघे काही दिवस शिल्लक राहिल्यामुळे बाजारात ग्राहकांची गर्दी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. शहरातील प्रमुख बाजारपेठा सध्या विविध वस्तूंनी सजल्या असून सर्वत्र खरेदीसाठी आलेल्या नागरिकांची वर्दळ पाहायला मिळत आहे.



कपडे, पादत्राणे, टोपी, अत्तर, सेवईया तसेच इतर आवश्यक वस्तूंच्या दुकानांवर विशेष गर्दी दिसून येत आहे. त्याचबरोबर सुके मेवे विकणाऱ्या दुकानांवरही ग्राहकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळत आहे. दुकानदारांनी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आपापली दुकाने आकर्षक पद्धतीने सजवली असून रंगीबेरंगी सजावट बाजाराच्या सौंदर्यात भर घालत आहे. पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम बांधव संपूर्ण महिनाभर रोजा ठेवून अल्लाहची इबादत करतात. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत अन्न-पाणी त्याग करून रोजा पाळला जातो आणि सायंकाळी इफ्तारच्या वेळी रोजा सोडला जातो. या काळात नमाज, इबादत आणि दानधर्माला विशेष महत्त्व दिले जाते. गरजू आणि गरीब लोकांना मदत करण्यासाठी सदका आणि खैरात मोठ्या प्रमाणावर केली जाते. यंदाच्या ईदच्या खरेदीवर महागाईचा प्रभाव स्पष्टपणे दिसत आहे. कपडे, सुके मेवे तसेच इतर वस्तूंच्या किंमतीत गेल्या वर्षाच्या तुलनेत वाढ झाली आहे. तरीही नागरिक ईद सणाचा आनंद साजरा करण्यासाठी उत्साहाने खरेदी करत आहेत.

**बाजारात रात्री उशिरापर्यंत गजबज**

संध्याकाळनंतर बाजारपेठांमध्ये अधिकच गर्दी वाढत असून रात्री उशिरापर्यंत खरेदी सुरू असते. कुटुंबासह खरेदीसाठी येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. विशेषतः लहान मुलांसाठी नवीन कपडे, चपला आणि खेळण्यांची खरेदी मोठ्या उत्साहात होत आहे.

**सुके मेवे आणि सेवईंच्या दुकानांना मागणी**

रमजान महिन्यात सुके मेवे आणि सेवईंची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. आलेगावमधील बाजारात काजू, बदाम, पिस्ता, मनुका, खजूर तसेच विविध प्रकारच्या सेवई आकर्षक पद्धतीने मांडण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांचे लक्ष वेधले जात आहे. दुकानदारांच्या मते, ईद जवळ येताच ग्राहकांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता असून पुढील काही दिवस बाजारपेठेत अधिक गर्दी होणार आहे. संपूर्ण शहरात ईद-उल-फितर सणाच्या स्वागतासाठी उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

# महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी सम्मेलन व मारवाड़ी युवा मंच तर्फे मारवाड़ी समाजातील स्वीकृत नगरसेवकांचा सत्कार

प्रतिनिधी १८ मार्च




**अकोला :** राजस्थानी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यात सक्रिय योगदान देणाऱ्या महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी संमेलन व मारवाडी युवा मंच, अकोला शाखेच्या संयुक्त विद्यमाने महानगरातील मारवाड़ी समाज चे नवनियुक्त स्वीकृत नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी संमेलनचे प्रांतीय अध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष ब्रिजमोहन चितलांगे, शहराध्यक्ष ॲड. सुरेश अग्रवाल (गुरुजी), महामंत्री श्याम शर्मा तसेच मारवाडी युवा मंचचे प्रांतीय उपाध्यक्ष रोहित रूंगटा, जिल्हाध्यक्ष भूषण अग्रवाल व सचिव निर्मल समदडीया यांनी अकोला महानगरपालिकेचे मारवाड़ी समाजाचे नवनियुक्त स्वीकृत नगरसेवक सुनील इन्नानी व सौ. चंदादेवी शर्मा यांच्या निवासस्थानी भेट देऊन शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देत त्यांचा सन्मान केला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सुनील इन्नानी व सौ. चंदादेवी शर्मा यांनी समाजहित व शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करण्याचा तसेच महानगरातील प्रलंबित नागरी समस्यांच्या निराकरणासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या प्रसंगी मारवाडी संमेलनाचे जयप्रकाश चांडक, अश्विन कटारिया, संतोष छाजेड, रोहित केडिया, कुंजीलाल सुनारीवाल, निलेश अग्रवाल, श्रीकांत गोयनका, हरीश खंडेलवाल, प्रदीप रांदड, निलेश मेहता तसेच मारवाडी युवा मंचचे नमन खंडेलवाल, सर्वेश अग्रवाल, अभिषेक अग्रवाल, सुमित वर्मा, अभिजीत गोयनका यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटच्या 4 विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयात निवड



प्रतिनिधी १८ मार्च

**आलेगाव :** डोंगराळ व आदिवासीबहुल परिसरात शिक्षणाचा दीप प्रज्वलित ठेवणाऱ्या आलेगाव येथील जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट शाळेने यंदाही आपल्या गुणवत्तेची छाप उमटवत यशाची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत शाळेतील चार विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत नवोदय विद्यालयात स्थान मिळवले असून या यशामुळे संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावर्षी नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत शाळेतील हार्दिक राठोड, स्वरित पस्तापुरे, दिव्यांशी बसवनाथे आणि समीक्षा तेलगोटे या चार विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. ग्रामीण भागातील मर्यादित शैक्षणिक साधनसामग्री असतानाही या विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे आलेगावसह परिसरातील शैक्षणिक वातावरणात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आलेगाव हा डोंगराळ भागात असून गावाच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात आदिवासीबहुल गावे आहेत. अशा परिस्थितीत ग्रामीण व आदिवासी पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांनी नवोदयसारख्या राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळवणे ही मोठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे पातूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रवीण डाबेराव, केंद्रप्रमुख तथा विस्ताराधिकारी निवास चव्हाण, तसेच विशेष साधन व्यक्ती राजेंद्र कटरे यांचे मार्गदर्शन आणि वेळोवेळी मिळालेले प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या नवोदय प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी शाळेकडून विशेष नियोजन करून नियमित सराव परीक्षा, मार्गदर्शन वर्ग आणि अभ्यास सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष अक्षय जैन आणि मुख्याध्यापक महावीर जैन यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. 'विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे नियोजन आणि पालकांचा पाठिंबा यामुळेच हे यश शक्य झाले आहे,' अशा शब्दांत मुख्याध्यापकांनी आनंद व्यक्त केला. शाळेतील सर्व शिक्षकवृंदांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या यशामुळे जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट शाळेची शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून परिसरातील इतर विद्यार्थ्यांसाठीही हे प्रेरणादायी ठरत आहे.

# डॉ. नितेश वानखडे यांना पीएचडी प्रदान

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला :** वणी (रंभापूर) येथील रहिवासी डॉ. नितेश जनार्दन वानखडे यांना महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीच्या वतीने आयोजित ३९ व्या दीक्षांत समारंभात वनस्पतीशास्त्र (बियाणे विज्ञान व तंत्रज्ञान) या विषयातील पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.



त्यांनी आपला शोधनिबंध ' इफेक्ट ऑफ बियोसिंथेसाइझड मेटल नॅनोपार्टिकल ऑन बल्ब प्रॉडकशन, क्वालिटी सीड प्रॉडकशन अँड सीड स्टोरेबीलिटी ऑफ ओनियन' या विषयावर डॉ. व्ही. आर. शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. त्यांना या यशाबद्दल डॉ. विलास खर्चे, कुलगुरू, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या हस्ते पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. वानखडे हे कापूस संशोधन विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे कनिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय कुटुंबीय, शिक्षक, तसेच विद्यापीठ प्रशासनास दिले. त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन होत आहे.

# युवा उद्योजक पुरस्कार नंदकिशोर शेगोकार यांना प्रदान

प्रतिनिधी १८ मार्च




**अकोट :** शहरातील प्रयोगशील शेतकरी व समाजसेवक नंदकिशोर शेगोकार यांना कृषी पदवीधर आयडॉल म्हणून नुकताच सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. गडाख यांनी प्रदान केला.

यावेळी मंचावर कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळपांडे, डॉ. गुप्ता मॅडम, बकाले उपस्थित होते. तसेच सभागृहांमध्ये प्रा. डॉ. राजेश पातोडे, डॉ. एम. एम. देशमुख, डॉ. देशमुख मॅडम, कराळे तसेच तंत्रज्ञान व अवजारे प्रात्यक्षिका करिता शेतकरी बांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषी पदवीधरांनी शेती व्यवसायांमध्ये यावं तसेच त्यांना प्रेरणा मिळावी म्हणून या पुरस्काराची सुरुवात कुलगुरू डॉ. गडाख यांनी केलेली आहे, ह्या पुरस्काराची विशेषता म्हणजे संपूर्ण ११ जिल्ह्यात कृषी विस्तार शिक्षण संचालयाच्या वतीने पीकेव्हीच्या शाखेमध्ये पीकेव्ही आयडॉलचे कृषी उद्योगाचे माहितीचे फलक दर्शनी भागात लावण्यात येते. नंदकिशोर शेगोकार यांनी व्यवसाया सोबत कृषी क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आलं. त्यांनी ट्रॅक्टर सर्विस सेंटर पासून सुरुवात करत, एमआर एफ टायर सर्विसेस देत, २००८ पासून शेतकरी उद्योग समूहाची स्थापना करत नाविन्यपूर्ण चा प्रयोगशील शेती करत उत्पन्न वाढीचे मॉडेल अवलंबून, जल संधारण मॉडेल अंतर्गत पाणी आडवा पाणी जिरवा उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली, १५००० पक्षी क्षमतेचे आधुनिक एसी बॉयलर पोल्ट्री फार्म निर्मिती करत आपल्या इंजिनिअर पुतण्या अक्षय शेगोकार ला सोबत घेत रोजगार निर्मितीला वाव दिला.

स्वतःच्या नऊ एकरावर तथा कंत्राटी चार एकरावर केळी लागवड करीत नवनवीन प्रयोग करत भरघोस उत्पन्न घेत आहेत. त्या सोबत हे इतर शेतकऱ्यांना केळी लागवडीस प्रेरित करत आहेत. शेती हा व्यवसाय उद्योग धंद्याप्रमाणे करा असा संदेश ते नेहमी शेतकऱ्यांना देत असतात. कापूस, तूर व सोयाबीन चे पण उत्कृष्ट उत्पन्न घेतात. ते नेहमी शेतकरी व विद्यार्थ्यांना यांत्रिकीकरणावर तसेच ध्येय निश्चिती वर नेहमी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतात. यापूर्वी अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १८ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# दारव्ह्यात 12 घरगुती गॅस जप्त

प्रतिनिधी १८ मार्च




**यवतमाळ** : दारव्हा शहर व ग्रामीण भागात घरगुती गॅसचा अवैधरित्या वापर करणाऱ्यावर गोपनीय पथकांने धाड टाकून १२ घरगुती गॅस सिलेंडर जप्त केले.

सध्यस्थितीत जागतिक युद्ध परिस्थिती विचारात घेता इंधनाबाबत तूटवडा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परीस्थितीमध्ये घरगुती गॅसचा वितरण सुरळीत ठेवण्यासाठी शासन निर्णयान्वये घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्याकरिता गॅस व्यावसायिकांच्या तपासण्या करण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुषंगाने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्या करिता तहसिलदार दारव्हा यांचे मार्गदर्शनाखाली ६ गोपनीय पथके नेमून दारव्हा शहरी विभाग व काही ग्रामीण भागामध्ये नायब तहसिलदार एस डब्लू आंबेकर, मंडळ अधिकारी बाळकृष्ण गाढवे, म.अ. जोशी, म.अ. मेश्राम यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी, शिपाई, कोतवाल व पुरवठा विभागातील कर्मचारी असे पथक नेमून एकाच वेळी शहरी व काही ग्रामीण भागामध्ये धाडी टाकून/तपासण्या करून एकूण १२ घरगुती गॅस सिलेंडरचा अवैधरित्या वापर करीत असल्याचे निदर्शनास आल्याने जप्त करण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

नागरिकांनी गॅस सिलेंडरचा अनावश्यक साठा करू नये. गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून घाबरून अतिरिक्त सिलिंडर बुक केल्यास वितरण व्यवस्थेवर ताण येतो, तसेच वितरकांना पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या गॅस एजन्सीला सूचना देण्यात येत आहे. अशी प्रतिक्रीया पुरवठा निरीक्षक तुषार राठोड यांनी दिली. घरगुती सिलेंडरचा दारव्हा तालुक्यात पुरेसा साठा उपलब्ध आहे. कोणीही व्यावसायिक वापरासाठी घरगुती सिलेंडर वापरू नये असे आवाहन तहसिलदार दारव्हा राजेश पउळ यांनी केले.

# लाचखोरी: तलाठ्याला ७ वर्षांची शिक्षा

## ३ लाखांचा दंड ठोठावला : जिल्हा न्यायालयाचा निकाल

प्रतिनिधी १८ मार्च



**यवतमाळ** : लाचलुचपत प्रकरणात दोषी ठरलेल्या तलाठ्याला येथील जिल्हा न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने आरोपी संजय शेषराव नक्षणे याला एकूण ७ वर्षे सश्रम कारावासासह ३ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. या निकालामुळे लाचखोरीविरोधात कठोर संदेश गेला आहे.

आरोपी संजय नक्षणे हा तलाठी म्हणून कार्यरत असताना फिर्यादी संदीप रामदास गुल्हाणे (रा. उज्वल नगर, यवतमाळ) यांच्याकडून शेताच्या फेरफार नोंदी व ७/१२ उतारा तयार करून देण्यासाठी लाचेची मागणी केली होती.

याबाबत फिर्यादीने तक्रार केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा नोंदवून कारवाई केली होती. या प्रकरणाचा तपास पोलीस उपअधीक्षक सतिष देशमुख यांनी केला. तपासादरम्यान सादर करण्यात आलेल्या पुराव्यांवर व साक्षीदारांच्या जबाबांवरून न्यायालयाने आरोपी दोषी ठरवला. या खटल्यात सरकारी पक्षातर्फे एकूण चार साक्षीदार तपासण्यात आले. जिल्हा न्यायाधीश-१ तथा विशेष न्यायाधीश एस. यु. बघेले यांनी दिलेल्या निकालानुसार, आरोपीस लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ च्या कलम ७ अंतर्गत ५ वर्षे सश्रम कारावास व १ लाख रुपये दंड, तसेच दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. तसेच कलम १३(२) अंतर्गत ७ वर्षे सश्रम कारावास व २ लाख रुपये दंड, दंड न भरल्यास १ वर्ष ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

याशिवाय, दंडाच्या रकमेतून ५ हजार रुपये फिर्यादीस नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी वकील नरेंद्र एन. पांडे यांनी काम पाहिले, तर पैरवी अधिकारी गोवर्धन जनार्धन वाढई यांनी सहकार्य केले.

# अल्पवयीन मुलीचे लग्न; बाळाला दिला जन्म

प्रतिनिधी १८ मार्च

**झरी** : तालुक्यातील एका ग्रामीण भागात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे लग्न लावण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. मुलीने पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीवरून आई-वडील, पती, सासरे-सासू आणि शेतमालकासह सहा जणांवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हे लग्न फेब्रुवारी २०२५ मध्ये झाले असून, त्यानंतर मुलगी गर्भवती झाली. अन् फेब्रुवारी २०२६ मध्ये तिने बाळाला जन्म दिला आहे. त्यानंतर या घटनेचे बिंग फुटले आहे.

मुकुटबन पोलीस ठाण्याने नोंदवलेल्या गुन्ह्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ६४ (१), ६४ (२) (आय), (एम), ३ (५), तसेच बालकांच्या लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पॉक्सो) २०१२ च्या कलम ९, १०, ११ आणि अनुसूचित जाती व जनजाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

**आई–वडीलांसह सहा जणांवर गुन्हा दाखल**

मुलीने दिलेल्या जबाबानुसार, तिच्या आई-वडिलांनी शेतमालक यांच्या सूचनेनुसार हे लग्न ठरवले. मुलगी व तीचा पती हे दोघेही वेगवेगळ्या समाजाचे आहे. जातीतील फरक व मुलगी अल्पवय असल्याची पूर्ण माहिती असूनही लग्न करण्यात आले. लग्न एका मंदिरात पारंपरिक रीतीने झाले. लग्नानंतर मुलगी सासरी राहत होती. दरम्यान ती गर्भवती राहील्याने तीला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या मुलीचे सिरज झाले असून, तीने स्त्री जातीच्या बाळाला जन्म दिला. सदर मुलगी अल्पवयीन असल्याचा संशय डॉक्टरांना आला होता. त्यांनी या बाबतची माहिती पोलिसांना दिली होती. त्यावरुन या प्रकरणाचा भंडाफोड झाला आहे. पिडीत मुलीने या प्रकरणाची तक्रार मुकुटबन पोलीस ठाण्यात दिली असून, पोलिसांनी पिडीत मुलीचे आई-वडील, पती, सासु-सासरे, शेतमालक यांच्या विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास वणीचे पोलीस उपविभागीय अधिकारी सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# यवतमाळात इफ्तार व सत्कार कार्यक्रम

प्रतिनिधी १८ मार्च



**यवतमाळ** : पवित्र रमजान महिन्यानिमित्त हजरत हाजीब शकरबार फाऊंडेशन, यवतमाळ (नरहड शरीफ, राजस्थान) ग्रुपच्या वतीने आयोजित रोजा इफ्तार कार्यक्रम भक्तिभाव आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला शहरातील मान्यवर, धर्मप्रेमी नागरिक तसेच तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्रितपणे रोजा इफ्तार करून ऐक्य, शांतता आणि भाईचाऱ्याचा संदेश दिला. यावेळी ७० ते ७५ वयोगटातील नियमित पंजगाना व तरावीह नमाज अदा करणाऱ्या ज्येष्ठांचा विशेष सत्कार करण्यात आला. गफार दुंगे, हाजी शब्बीर खान, हाजी उस्मान अली, इसराईल मिर्जा, हाजी मजीद भाई मेमन, हाजी गफार खान, मुबारक शाह आणि हाजी हाफिज मिर्झा यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हाजी सलीम तगाले यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्रुपच्या सदस्यांनी परिश्रम घेऊन उपस्थितांसाठी इफ्तारची उत्तम व्यवस्था केली.

यावेळी आयोजक वसीम तगाले, शहाद तगाले, सजु तगाले, शब्बीर तगाले, जाकीर दुंगे, अनिस अली, मोबीन शेख, टिपु देशमुख, रियाज दुंगे, तारीक तगाले, फैजान तगाले, जाबो तगाले, एजाज तगाले, हाशम, सलमान, अमीन, अरशद मलनस, सलीम गोरी, उस्मान अली, राफे ईमाम, गोल्डन पार्क मस्जिदचे साबीर हुसैन, हाफीज मकसूद, रजा मौजन, गुलाम रब्बानी उपस्थित होते.

# घाटंजीत 'उलगुलान' चक्काजाम

प्रतिनिधी १८ मार्च



**घाटंजी** : राज्यात आरक्षणाच्या मुद्द्यावर सुरू असलेल्या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर सकल आदिवासी समाजाने आज दि. 17 मार्च रोजी घाटंजीत 'उलगुलान' चक्काजाम आंदोलन करून आपला तीव्र विरोध नोंदविला. वीर बाबुराव शेडमाके चौक व खापरी नाका येथे या आंदोलकांनी रस्त्यावर बसून वाहतूक ठप्प केली, ज्यामुळे काही काळ परिसरात दाटीगती निर्माण झाली. प्रशासनाच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आली.

शासनाने 27 फेब्रुवारी 2026 रोजी बंजारा समाजाचा आदिवासी प्रवर्गात समावेश करण्यासाठी समिती स्थापन केली होती. मात्र, आदिवासी समाजाने ही समिती मान्य नसल्याचे स्पष्ट करून तात्काळ रद्द करण्याची मागणी आंदोलनादरम्यान केली. आंदोलकांनी तसेच मागणी केली की, समितीच्या कामकाजाचा आणि खर्चाचा भरणा आदिवासी विभागाद्वारे केला जावा आणि आदिवासी समाजातील लोकप्रतिनिधींनी यावर स्पष्ट भूमिका घेऊन अन्यथा पदाचा राजीनामा द्यावा.गेल्या काही दिवसांपासून विविध समाजांकडून आदिवासी प्रवर्गात समावेश करण्याच्या मागण्यांमुळे राज्यातील आदिवासी समाजात चिंता निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर बंजारा समाजानेही आरक्षणासाठी आपली मागणी केली होती. परंतु, समिती स्थापन झाल्यानंतर आदिवासी समाजात तीव्र असंतोष आणि विरोध निर्माण झाला, ज्यातून आजचा 'उलगुलान' चक्काजाम आंदोलन उभा राहिला. प्रशासनाच्या वेळोवेळी हस्तक्षेपामुळे रस्त्यावरून वाहतूक सुरळीत करण्यात आली, मात्र आंदोलकांनी आपले संदेश थेट सरकारकडे पोहचवले आहेत.

# डिक्की फोडून दीड लाखांची चोरी

प्रतिनिधी १८ मार्च

**उमरखेड** : एसबीआय बँकेसमोर दिवसाढवळ्या स्कुटीच्या डिक्कीमधून तब्बल १ लाख ५० हजार रुपये चोरट्यांनी लंपास केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी १७ मार्च, दुपारी शहरातील पुसद रोडवरील एसबीआय बँकेसमोर, उघडकीस आली असून शहरात खळबळ उडाली आहे.

बांधकाम व्यवसायिक अनिल टाक यांनी महाराष्ट्र बँकेतून १ लाख ५० हजार रुपये काढले होते. हे पैसे स्कुटीच्या डिक्कीमध्ये ठेवून ते एसबीआय बँकेत खात्यात जमा करण्यासाठी गेले. बँकेसमोर गाडी उभी करून ते आत काउंटरवर गेले असता, पैसे डिक्कीतच राहिल्याचे त्यांच्या लक्षात आले. तात्काळ बाहेर येऊन त्यांनी गाडी तपासली असता डिक्की उघडून अज्ञात चोरट्यांनी पैशांवर डल्ला मारल्याचे समोर आले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच अनिल टाक यांनी पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता दोन संशयित व्यक्ती चोरी करताना दिसून आल्या असून त्यांचे चित्रफीत पोलिसांच्या हाती लागले आहे. वृत्त लिहीपर्यंत या प्रकरणी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती. पुढील तपास उमरखेड पोलीस करत आहेत.

# बसवेश्वर भवनात पाडवा पहाट

प्रतिनिधी १८ मार्च

**यवतमाळ** : वीरशैव हितसंवर्धक मंडळ, वसुधा प्रतिष्ठान, लिंगायत महिला मंडळ यवतमाळच्या वतीने भक्तिमय आणि सांस्कृतिक असा 'लिंगायत पाडवा पहाट-२०२६' कार्यक्रम गुरुवारी (१९ मार्च) सकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

येथील दारव्हा रोडवरील महात्मा बसवेश्वर सांस्कृतिक भवनात होणाऱ्या या कार्यक्रमात लिंगायत समाजातील गायक, गायिका गीते सादर करणार आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने केले आहे.

# पुसद मतदारसंघातील 10 तांडा वस्तीमध्ये वाचनालये उभारणार; 2.5 कोटींचा निधी मंजूर

प्रतिनिधी १८ मार्च



**पुसद** : पुसद मतदारसंघातील तांडा वस्तीतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण उपक्रम उचलण्यात आला आहे. राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्यामुळे 10 गावातील तांडा वस्तीमध्ये आधुनिक वाचनालये उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या कामांसाठी एकूण 2 कोटी 50 लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. योजनेअंतर्गत प्रत्येक वाचनालयाच्या बांधकामासाठी 25 लाख रुपये राखीव आहेत. प्रशासकीय मंजुरी मिळताच कामांची सुरुवात होणार आहे. या वाचनालयांमुळे परिसरातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होतील आणि स्पर्धा परीक्षांसाठी योग्य वातावरण निर्माण होईल. परिणामी, विद्यार्थी आपल्या गावात राहूनच उच्च शिक्षणाची तयारी करू शकतील.

पुसद मतदारसंघ हा बंजारा समाज बहुल भाग असून, येथे बंजारा समाजाचे नेतृत्व नाईक परिवार मागील 70 वर्षांपासून करत आहे. अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती मर्यादित असल्यामुळे मुलांना शहरात जाऊन शिक्षण घेणे शक्य नसते. या अडचणीचा विचार करून गावपातळीवरच वाचनालय उभारण्याचे ठरवले आहे. या उपक्रमाबाबत बोलताना राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी म्हटले की, "तांड्यांच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी नाईक परिवार कटिबद्ध असून येत्या काळात पुसद मतदारसंघातील सर्व गावात वाचनालय विकसित करण्याचे स्वप्न आहे." बंजारा समाजात या पुढाकाराबद्दल राज्यमंत्री इंद्रनील नाईक व नाईक परिवाराबद्दल कृतज्ञतेची भावना व्यक्त केली जात आहे. आगामी काळात या वाचनालयांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. योजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात होताच, पुसद मतदारसंघातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याला मोठा लाभ मिळणार आहे.

# बिटरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारु अड्ड्यावर एलसीबीची धाड


प्रतिनिधी १८ मार्च

**उमरखेड** : बिटरगाव पोलीस स्टेशन हद्दीत मेट, ढाणकी आणि बिटरगाव शिवारातील अवैध हातभट्टी व देशी-विदेशी दारू अड्ड्यांवर यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली. या धाडीत गावठी, देशी व विदेशी दारू आणि मोहमाच सडवा असा एकूण 59,060/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, दि. 16 मार्च रोजी मेट आणि ढाणकी तसेच बिटरगाव शेत शिवारात 48 हजार रुपयांच्या 1200 लिटर मोहमाच सडवा, 3 हजार रुपयांच्या 30 लिटर गावठी दारू आणि 8,060 रुपयांच्या देशी-विदेशी दारू जप्त करण्यात आले. या कारवाईत गजानन शामराव जाधव (42, रा. मेट), रमेश थावरा चव्हाण (34, रा. मेट), देविदास चंदू कवडे (रा. बिटरगाव), संतोष नारायण देवकते (35, रा. बिटरगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेच्या वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ए.पी.आय. बांडे, पी.एस.आय. शरद लोहकरे आणि त्यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. स्थानिक पोलिसांनी नागरिकांना सांगितले की, कोणत्याही प्रकारच्या अवैध दारू विक्री किंवा हातभट्टीविषयी माहिती असल्यास लगेच पोलिसांना कळवावे, अशी विनंती करण्यात आली आहे. या कार्यवाहीमुळे बिटरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू आणि हातभट्टीविरुद्ध कडक कारवाई सुरु असल्याचे संकेत मिळाले आहेत, तसेच स्थानिक नागरिकांमध्ये कायदेशीर सुरक्षा आणि नियमपालनाची जाणीव वाढेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# रस्त्यांच्या कामांसाठी आ.किसनराव वानखेडे यांनी विधानभवनात लक्षवेधी

प्रतिनिधी १८ मार्च




**उमरखेड** : हॅम (MSIDC) योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पुसद-उमरखेड-हरदडा (51C) आणि विडूळ - साखरा - देवसरी (51D) रस्त्यांच्या कामांबाबत आमदार किसनराव वानखेडे यांनी दि. 17 मार्च रोजी विधानभवनात लक्षवेधी मागणी करून विकासासाठी आवाज उठविला. त्यांनी रस्त्यांच्या रुंदीकरणासह सिमेंट कॉंक्रीट नाल्यांच्या बांधकामासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली.

सदर रस्ते अत्यंत महत्त्वाचे असून मोठ्या प्रमाणात वाहतुकीसाठी वापरले जातात. या मार्गावर पोफाळी येथे वसंत सहकारी साखर कारखाना, उमरखेड शहरातील अनेक शैक्षणिक संस्था – गोरोबा शाळा, महात्मा ज्योतिबा फुले शाळा, युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम, स्टुडंट वेलफेअर इंग्लिश मीडियम स्कूल, कृषी महाविद्यालय, गोपिकाबाई सिताराम गावंडे महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) – तसेच MIDC क्षेत्र आणि प्रसिद्ध सहस्त्रकुंड धबधबा हे पर्यटन स्थळ आहे. या रस्त्याचे राष्ट्रीय महामार्ग व प्रस्तावित वर्धा–यवतमाळ–नांदेड रेल्वे मार्गाशी जोडलेले महत्व लक्षात घेतले पाहिजे.

आमदार वानखेडे यांनी सांगितले की, 51C मार्गावर पोफाळी, कुपटी, मरसूळ-बेलखेड फाटा, उमरखेड–चुरमुरा-टाकळी फाटा आणि 51D मार्गावरील विडूळ, चालगणी, साखरा, खरूस, कारखेड फाटा व देवसरी ही गावं या रस्त्यालगत आहेत. तथापि अंदाजपत्रकात रुंदी केवळ 7 मीटर प्रस्तावित आहे, जी वाढत्या वाहतुकीसाठी अपुरी आहे. गावांच्या हद्दीत 10–12 मीटर रुंदीकरण आणि दोन्ही बाजूंनी कॉंक्रीट नाल्यांची आवश्यकता आहे. आमदार वानखेडे यांनी मागणी केली की, उमरखेड शहरातील रस्त्यांचे चौपदरीकरण व दोन्ही बाजूंनी कॉंक्रीट नाली बांधणी तातडीने करावी. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेन्द्रराजे भोसले यांनी या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद दिला असून, वेगळा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आहे.

या मागणीमुळे पुसद व उमरखेड मतदारसंघातील रस्ते विकासास गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे, तर स्थानिक रहिवासी आणि शैक्षणिक संस्था यांच्यासाठी वाहतुकीची सुरळीत सुविधा सुनिश्चित होणार आहे.

# लग्नसोहळ्यात चोरी : विधी संघर्षग्रस्त बालक ताब्यात

प्रतिनिधी १८ मार्च




**यवतमाळ** : गेल्या वर्षभरापासून लग्नसमारंभ व मंगल कार्यालयांमध्ये घडणाऱ्या चोरीच्या मालिकेचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांनी सुमारे १९ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वधू-वर पक्षातील नातेवाईकांच्या बॅगमधून, विशेषतः सोन्याचे दागिने चोरणाऱ्या टोळीने यवतमाळ उपविभागात अनेक ठिकाणी हात साफ केला होता. या वाढत्या घटनांची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक कुमार चिंता व अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांना विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने, अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने घटनास्थळांची पाहणी करून सीसीटीव्ही फुटेज, छायाचित्रे व व्हिडिओंचे बारकाईने विश्लेषण केले. तांत्रिक व भौतिक पुराव्यांच्या आधारे तसेच गोपनीय बातमीदारांच्या मदतीने आरोपींचा माग काढण्यात आला. ९ मार्च रोजी पथकाने मध्यप्रदेशातील राजगड जिल्ह्यात जाऊन बोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करत ग्राम गुलखेडी येथून एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून विविध गुन्ह्यांतील चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. लोहारा व अवधूतवाडी पोलीस ठाण्यांत दाखल तीन गुन्ह्यांमधून एकूण ११६ ग्रॅम सोन्यासह रोख रक्कम असा सुमारे १९ लाखांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणात बालकाला मदत करणारे सहआरोपीही निष्पन्न झाले असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे यांच्या नेतृत्वात पार पडली. या पथकामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदमवार, पोलीस उपनिरीक्षक सुरज जगताप, ए.एस.आय. सुरेश मेश्राम, पोलीस हवालदार विशाल भगत व बलराम शुक्ला, तसेच पोलीस कर्मचारी रुपेश ढोबळे, सचिन राठोड, राज कांबळे, मोहम्मद भगतवाले, योगेश चोपडे आणि नितीन खवडे यांचा सहभाग होता.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि. १८ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






## शिक्षणाधिकारी पेक्षा उपशिक्षणाधिकारी भारी...

# भ्रष्टाचारात 'आकाशभरारी'!

***शिक्षण विभागात भ्रष्टाचाराची स्पर्धा * जुन्या दलालाचे हाल * नवीन मालामाल**

***महिला शिक्षणाधिकाऱ्यांनी भ्रष्टउपशिक्षणाधिकाऱ्याची 'कवच कुंडले' काढली**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शिक्षणाधिकाऱ्यांनी ५० हजाराची लाच मागितल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे यांनी व्हायरल केल्यानंतर शिक्षण विभाग पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला. वाशीम जिल्ह्याचा माध्यमिक शिक्षण विभाग भ्रष्टाचाराने बरबटलेला आहे. या कार्यालयातील उपशिक्षणाधिका-याने भ्रष्टनीती वापरून कोट्यवधीची 'आकाश भरारी' घेतल्याची शिक्षण क्षेत्रात चर्चा आहे. भ्रष्टांच्या स्पर्धेत महिला अधाका-याने कथित उपशिक्षणाधिका-याची कवचकुंडले काढून घेतल्याने सद्या जुन्या चेलेचपाट्यांचे हाल सुरु असून नवे दलाल मालामाल होत असल्याची चर्चा आहे.

भ्रष्टाचाराच्या वाळवी लागलेल्या वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागात सावळा गोंधळ सुरू आहे. अनेक भ्रष्टाचाराचे कारनामे उघड असतांना पारदर्शकतेची आव आणल्या जात आहे. जुन्या दलालाची दलाली बंद झाली असून नव्या दलालाच्या व महिला ईओच्या भ्रष्टनीतीमुळे शिक्षण विभाग त्रस्त झाला असून सर्व शिक्षकांसह संस्थाचालकांमध्येही खळबळ उडाल्याचे वृत्त आहे. त्यामुळे वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागाच्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी होत आहे.





वाशीमचा माध्यमिक शिक्षण विभाग सुरूवातीपासूनच विविध गैरप्रकारामुळे राज्यात बदनाम झालेला आहे. त्यामुळे वाशीमला प्रामाणिक अधिकारी रूजू होण्यासाठी नकार देतात. काही प्रामाणिक अधिकारी पदोन्नतीने कारभार करतात. परंतु त्यांचे कालावधीत कार्यरत असलेले आणि वाममार्गाने पैसा जमा करणारे कथित उपशिक्षणाधिकारी 'मालामाल' झाल्याच्या अनेक सुरस कथा ऐकण्यात आहेत माजी शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे यांचे निवृत्तीनंतर जवळपास आठ महिने माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्याचे पद रिक्त होते. १५ वर्षापासून उपशिक्षण पदावर असतांना प्रत्येक शिक्षणाधिकाऱ्यांना जाळयात घेवून या भ्रष्ट उपशिक्षणाधिकाऱ्यांनी भ्रष्ट्राचारात आकाशभरारी घेतली आहे. त्याने शेकडो कोटीची मालमत्ता जमा केली असून या भ्रष्टउपशिक्षणाधिकाऱ्याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. विद्यमान महिला शिक्षणाधिकारी यांना विदर्भातील एका मंत्र्याच्या कृपेने वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागाची 'जहाँगिरी 'प्राप्त झाल्याची शिक्षण क्षेत्रात चर्चा आहे. राज्यातील एका वजनदार मंत्र्याचा 'राजाश्रय 'असल्याने या ईओ ने खुलेआम त्यांच्या दालनातच संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून पैशाची लूट सुरू केली असल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. नवीन दलालाने त्या महिला ईओची हुजरेगिरी करून विश्वास संपादन केल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे. मॅडमची मर्जी कायम राहावी म्हणून या नवीन दलालानी दररोजचे सावज हेरायचे आणि मॅडमला त्याच्याच चारचाकी वाहनाने संबंधित शाळेला भेट द्यायची, आणि मॅडमने संबंधित शाळेमध्ये काही त्रुट्या काढायच्या, शोकॉजची धमकी द्यायची असा प्रकार सुरू असतो. त्यामुळे शिक्षण विभागाला भ्रष्टाचाराची किड लागली आहे. भ्रष्टाचारात जुने व नवीन दलाल अशी स्पर्धा सुरू असून दुसरीकडे श्रेयवादाचे राजकारण शिक्षक नेत्यांमध्ये व शिक्षक संघटनामध्ये सुरू आहे. या सर्व प्रकारात शिक्षकांचे मात्र मरण होत आहे.

### पारदर्शकतेचा गाजावाजा, वसुलीचा बँडबाजा...

महिला ईओ वाशीमला रूजू झाल्यानंतर त्यांनी 'पारदर्शक' कारभाराचा गाजावाजा करून त्यांच्या कार्यालयातील उपशिक्षणाधिकारी व इतर कर्मचाऱ्यांना धारेवर धरले होते. तसेच त्यांनी काही शाळेच्या तक्रारी बाबत सुनावण्या घेवून तक्रारकर्त्यांना न्याय देण्याचा शब्द दिला होता. त्या सुनावण्या घेवून अनेक महिने होवूनही अद्यापपर्यंत कोणत्याही सुनावणीचा निकाल ईओ मॅडमने दिला नसल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे. ज्यांच्या विरोधात तक्रारी होत्या 'त्याच' लोकांकडून लालची ईओने भरमसाठ रक्कमा घेवून सुनावण्याचे निकाल दिले नसल्याचीही चर्चा आहे. माध्यमिक शिक्षण विभागातील खुलेआम सुरू असलेल्या खाबूगिरीसह दलालांचा त्वरीत बंदोबस्त करण्यासाठी सर्व शिक्षक संघटनांनी पुढाकार घेण्याची गरज आहे.

### शिक्षण अधिकारी, उपशिक्षणाधिकारी...
## सह सर्वांचे भ्रष्टधोरण, शिक्षकांचे मरण..!



### पैसे न देता काम झालेले दाखवा अन् बक्षीस मिळवा

२०१३ पासून शिक्षण विभागाच्या बोगस भरतीच्या विरोधात बॅकडेट भरतीच्या विरोधात, शिक्षक समायोजनाच्या विरोधात सिटी न्युज सुपरफास्टने शेकडो वृत्त मालिका लावल्या. कोण्या एकाच्या विरोधात कोण्या एकाच्या बाजूने कधीच वृत्त लिहिले नाही. भ्रष्टाचाराच्या विरोधात सत्याला न्याय देण्यासाठी मालिका चालविल्या आहेत. आणि यापुढेही न्यायासाठी सतत लढा कायम राहणार आहे. शिक्षण विभागाने सिटी न्युजच्या विरोधात अनेक खोटे गुन्हे दाखल केले आहेत. तरी सुध्दा सर्वच अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारांच्या विरोधात वृत्त मालिका चालवून न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. २०१३ पासून ज्या शिक्षणधिकाऱ्यांनी व उपशिक्षणाधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला त्यांच्या पुराव्यासहीत या अगोदर वृत्त मालिका लावल्या आहेत. शिक्षण विभागात आतापर्यंत एक नव्हेतर अनेकच शिक्षण अधिकारी , उपशिक्षणाधिकारी भ्रष्टाचारी आहेत. कोण्याच अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे पैसे न घेता शिक्षकांचे काम केले नाही. दाम दिल्या शिवाय काम होत नसल्याचे उघडच झाले आहेत. त्यामुळे कोण्या एकाची बाजू घेणे, कोण्या एकावर अन्याय करणे हे सिटी न्युजचे काम नसून अन्यायग्रस्तांना वृत्तातून पुराव्यासहीत न्याय देणे हेच काम आहे.

## थोडक्यात

### नियमित पिककर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना एक लाख रुपये प्रोत्साहन द्यावे -मापारी

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



नुकतेच चालू असलेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळ अधिवेशनात दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी महाराष्ट्रातील ३० सप्टेंबर २०२५ रोजी पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेअंतर्गत दोन लाख पर्यंतचे पीक कर्ज माफ करणार असून त्याचबरोबर नियमित पीक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना पन्नास हजार रुपये पर्यंत प्रोत्साहन जाहीर केले परंतु नियमित पीक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांचे पन्नास हजार रुपये पर्यंतचे प्रोत्साहन अत्यल्प होत आहे त्यामुळे प्रामाणिकपणे पीक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे एकतर सरसकट पीक कर्ज माफ करावे किंवा नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना एक लाखापर्यंत भरीव प्रोत्साहन द्यावी नियमित पीक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्याचा सन्मान राखून प्रामाणिकपणे पीक कर्ज भरल्यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ एक लाख रुपये प्रोत्साहन खात्यात जमा करावे अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रिसोड तालुका समन्वयक घनश्याम मापारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

### बंजारा धर्मगुरू नेहरू महाराज यांचा भव्य सत्कार



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरुळपीर तालुक्यातील मौजे गोलवाडी येथे संत सेवालाल महाराज संस्थानचा कळस स्थापन निमित्त धर्मगुरू महंत नेहरू महाराज यांचा भव्य सत्कार मा जगदंबा सार्वजनिक वाचनालय गोलवाडी येथे घेण्यात आला.

सेवालाल महाराज कळस स्थापना तपस्वी नेहरू महाराज यांच्या शुभ हस्ते करण्यात आले . यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून माँ जगदंबा सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष हरिशचंद वसराम चव्हाण व सचिव रुक्मिणी हरिश्चंद्र चव्हाण यांच्या हस्ते धर्मगुरू महंत नेहरू महाराज यांचा शाल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला . यावेळी माजी जि.प. सभापती शिंदे, ताड्?यांचे नायक निरंजन नाईक, वसंत चव्हाण, उत्तम चव्हाण, विक्रम राठोड, राजु नाईक, सुभाष चव्हाण, रमेश चव्हाण, लोकचंद चव्हाण माजी सरपंच दत्ता शिंदे, गजानन राठोड , तांड्याचे कारभारी विष्णू नाईक, उदल चव्हाण सुदाम जाधव सह गावातील प्रतिष्ठित तांड्यातील मंडळी उपस्थीत होते .

### तुळजापूर येथे दोन दिवसीय कार्यशाळा

**मंगरूळपीर :** महिला जागतिक दिनाचे निमित्ताने दि.०८ मार्च २०२६ रोजी महिला शक्ती, भक्ती भाव आणि सांस्कृतिक परंपरेचा गौरव करण्या साठी खास महिला भजन स्पर्धेचे आयोजन शिवलान यवतमाळ रोड दारव्हा येथे करण्यात आले

### अधिकारी पैशासाठी लाचार, बांधकाम विभागात भ्रष्टाचार...

# आधी दाम, नंतर काम, टक्केवारीत बदनाम!





*** सार्वजनिक बांधकाम विभागात अधिकारी व ठेकेदारांची भागिदारी**

*** शासकीय निवासस्थानाच्या देखभाल, दुरूस्तीच्या कामासाठी कार्यकारी अभियंत्याने कामे सुरू होण्यापुर्वीच ६० टक्के रक्कम अग्रिम दिली**

*** ३४ कामांच्या देखभाल, दुरूस्तीचे काम अहोरात्र सुरू**

*** ३१ मार्च पुर्वी ३ कोटी ४० लाखाची देयके काढण्यासाठी अधिकाऱ्यांचा पुढाकार**

*** कामे वाटपात अनियमितता झाल्याचा आरोप**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विविध योजनेतून कामे केल्याची अनेक कंत्राटदारांची लाखो रूपयाची देयके मागील दोन वर्षापासून अधिकाऱ्यांनी काढली नसल्याचे समजते. कार्यकारी अभियंता आणि काही अधिकाऱ्यांनी संगनमत करून वाशीम येथील शासकीय निवासस्थानाच्या देखभाल, दुरूस्तीची कामे त्यांच्या मर्जीतील लोकांच्या नावाने घेवून ही कामे सुरू होण्यापुर्वीच संबंधित ठेकेदाराला ६०इरक्कम अग्रिम दिल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातील खुलेआम सुरू असलेला भ्रष्टाचार निदर्शनास आला आहे. ही कामे वाटप करताना अधिकाऱ्यांनी शासनाच्या ३३टक्के प्रमाणात वाटप करण्याच्या आदेशाला वाटाण्याच्या अक्षदा लावल्याची चर्चा आहे.

वाशीम येथील ३४ शासकीय निवासस्थानाची देखभाल, दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समिती मार्फत तिन कोटी चाळीस लाखाचा निधी मंजूर झालेला आहे. प्रत्येक निवासस्थानाच्या देखभाल, दुरूस्ती साठी सार्वजनिक बांधकाम विभागाने भ्रष्टाचार करण्यासाठी तब्बल १० लाखाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. ही कामे ३१ मार्च २०२६ पुर्वी न केल्यास हा निधी परत जाईल, आणि अधिकाऱ्यांना मलिदा लाटता येणार नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, त्यांच्या मर्जीतील अधिकाऱ्यांनी ही ३४ कामे त्यांच्या मर्जीतील लोकांना देवून ही कामे करणाऱ्या ठेकेदाराला कामे सुरू होण्यापुर्वीच प्रत्येक ठेकेदाराला ६०इरक्कम अग्रिम देवून राज्यात भ्रष्टाचाराची अभिनव पद्धत सुरू केल्याचा आरोप केल्या जात आहे. वाशीम जिल्ह्यातील अनेक ठेकेदारांची देयके मागील दोन वर्षापासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रलंबित आहेत. ठेकेदारांची देयके प्रलंबित असल्याने अनेक ठेकेदारांवर कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे. तर दुसरीकडे कामे सुरू होण्यापुर्वीच कार्यकारी अभियंत्याने देखभाल, दुरूस्तीच्या ३४ कामामध्ये प्रत्येक ठेकेदाराला प्रत्येकी सहा-सहा लाख रूपये अग्रिम राशीचा धनादेश कामे सुरू होण्यापुर्वीच दिल्याने या देखभाल दुरूस्तीच्या कामात अधिकाऱ्यांची भागिदारी असल्याची गंभीर बाब अन्याय झालेल्या ठेकेदारांसह जागरूक नागरिकांच्या लक्षात आली आहे. १५ दिवसात मालामाल होण्याचा हा अभिनव फंडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. या कामात अनियमितता करून मालामाल होण्सासाठी पुढाकार घेणाऱ्या सर्व दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांचे विरोधात फौजदारी कारवाई करण्याची मागणीही जागरूक नागरिकांकडून केल्या जात आहे.

# भाजपवाले भाजपशी बेइमान, व्हायरल ऑडिओचे थैमान!

***विद्यमान नगरसेविकेचे पती तथा भाजपचे सक्रिय कार्यकर्ते कपिल सारडा यांना नोटीस**

***कथित व्हायरल ऑडिओ प्रकरणी भाजप मध्ये खळबळ**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●


वाशिम जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षातील अंतर्गत वाद आता उघडपणे समोर येऊ लागले असून, एका कथित व्हायरल ऑडिओ क्लिपमुळे पक्षात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी भाजप नगरसेविकेचे पती तथा भाजपचे सक्रिय कार्यकर्ते कपिल सारडा यांना पक्षाकडून अधिकृत नोटीस बजावण्यात आली आहे. सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये सारडा यांनी वाशिम नगरपालिका निवडणुकीदरम्यान पक्षविरोधी काम केल्याची कबुली दिल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे ही ऑडिओ क्लिप जिल्हाभर चर्चेचा विषय ठरली आहे.

भाजपचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांनी जारी केलेल्या नोटिसनुसार, संबंधित ऑडिओमध्ये कपिल सारडा यांनी पक्षातीलच नेते आणि वाशिम नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष अशोक हेडा यांच्याविरोधात आक्षेपार्ह व अश्लील भाषेचा वापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच वाशिम नगर पालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ मधील भाजपचे अधिकृत उमेदवार अशोक हेडा यांच्या विरोधात काम करून उबाठाच्या विजयी उमेदवाराला मदत केल्याचाही ठपका ठेवण्यात आला आहे. याशिवाय, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दलही अवमानकारक वक्तव्य केल्याचा उल्लेख नोटिसमध्ये करण्यात आला आहे. या सर्व बाबी पक्षशिस्तीच्या विरोधात असल्याचे नमूद करत, कपिल सारडा यांना ७ दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अन्यथा शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशाराही पक्षाकडून देण्यात आला आहे. या घटनेमुळे वाशिममधील भाजपमध्ये सुरू असलेली अंतर्गत नाराजी आणि गटबाजी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. त्यामुळे येत्या काळात या प्रकरणाला अधिक राजकीय रंग चढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, कपिल सारडा हे स्वतःला सक्रिय भाजप कार्यकर्ता म्हणून विविध कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहणारे म्हणून ओळखले जातात. काही काळापूर्वी अपघातात पाय फ्रॅक्चर झाल्यानंतरही ते वॉकरच्या सहाय्याने कार्यक्रमांना उपस्थित राहत असल्याने चर्चेत होते. अशा परिस्थितीत त्यांची ही कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने पक्षातील निष्ठेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही दिवसांपूर्वी वाशिमचे विद्यमान आमदार यांचीही एक अशीच कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. त्यामध्ये त्यांनी खुद्द जिल्हा अध्यक्षाच्या पत्नीला पाडा असे म्हटले होते. त्यामुळे 'पक्षाचं नाही राहिलं भान' अनेक जण हुतात बेईमान, व्हायरल ऑडिओचे थैमान अशी चर्चा रंगू लागली असून, भाजपमध्ये व्हायरल ऑडिओ प्रकरणांचे थैमान सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. आता कपिल सारडा नोटिसला काय उत्तर देतात आणि पक्ष त्याच्यांवर पुढे कोणती कारवाई करतो, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. मात्र व्हायरल ऑडिओ क्लिपची दै. सिटीन्युज सुपरफास्ट पूष्टी करत नाही.






### श्रीरामजन्मोत्सवानिमित्त जपयज्ञ तथा रघुवंश चिंतनसत्र!



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

श्रीमाता अमृतानंदमयी सत्संग समिती वाशिम तथा श्री.गजानन महाराज संस्थान आययूडीपी वाशिम तर्फे वाशिममध्ये विविध अध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.

त्यानुसार दरवर्षी प्रमाणे यंदाही गुढीपाडवा ते श्रीरामनवमी म्हणजे गुरुवार दिनांक १९/३/२०२६ ते गुरुवार दिनांक २६/३/२०२६ या कालावधीत स्थानिक आययूडीपी स्थित श्री.गजानन महाराज मंदिरात श्रीराम जन्मोत्सव आणि श्रीरामनाम जपयज्ञ आयोजित करण्यात येत आहे. या अध्यात्मिक साधनेत दररोज सकाळी ६ ते ७ या वेळेत ' श्रीरामप्रहरी श्रीरामनाम जपयज्ञ ' आणि भगवान श्रीरामचरित्रावर चिंतनसत्र होत असते. यावर्षीच्या चिंतनात महाकवी कालिदास विरचित रघुवंशावर चिंतन होणार असून विख्यात निरूपणकार विद्यावाचस्पती प्रा.दिलीपजी जोशी, वाशिम हे रघुवंशावर निरूपण करणार आहेत. श्रीराम जयराम जयजय राम या सिद्ध मंत्राचा सामूहिक जप देखिल होणार आहे. श्रीरामकथा ऐहिक आणि पारलौकिक सुखाचा मार्गसोपान असून ' श्रीराम जयराम जय जय राम ' हा परमशांती देणारा मंत्र आहे.

आनंदअनुभूती घेण्यासाठी सर्व श्रीराम उपासकांनी उपासनेत सहभागी होण्याचे आवाहन श्री.गजानन महाराज संस्थान आययूडीपी वाशिम तथा श्रीमाता अमृतानंदमयी सत्संग समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. १८ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# मूर्तिजापूरमध्ये वंचितच्या नगरसेवकांवर अपात्रतेची टांगती तलवार

◆ अ‍ॅड. बाळासाहेब आंबेडकरांच्या आदेशाला दाखवली होती केराची टोपली

प्रतिनिधी १८ मार्च

**मूर्तिजापूर :** नगर परिषदेत मोठा राजकीय वाद उफाळून आला असून काही नगरसेवकांच्या पात्रतेवर प्रश्न उपस्थित करत अधिकाऱ्यांकडे औपचारिक याचिका दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे स्थानिक राजकारणात खळबळ उडाली आहे. नगरपरिषद निवडणुकीमध्ये शेख इमरान शेख खलील यांचा नगराध्यक्ष पदासाठी कमी मताने पराभव झाल्याने अँड बाळासाहेब आंबेडकर यांनी शेख इमरान यांना स्वीकृत नगरसेवक करण्याचे आदेश दिले होते परंतु त्या आदेशाला गटनेते

तसव्वर खान व इतर नगरसेवकांनी केराची टोपली दाखवली स्वीकृत नगरसेवकाची निवडणुकांचे वेळी स्वतः जिल्हा अध्यक्ष प्रमोद देवडे हजर होते परंतु मुर्तीजापुर येथील वंचितच्या नावाखाली निवडून आलेले नगरसेवकांनी आपला मोबाईल बंद करून भाजपाचे संजय डागा यांना मदत करून स्वीकृत नगरसेवक बनवण्यासाठी पुढाकार घेतला वंचित बहुजन आघाडीमध्ये एडवोकेट बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाला घरचा रस्ता दाखवण्यात आला या कारणामुळे वंचित बहुजन आघाडीने पुढाकार घेऊन या मुर्तीजापुर नगरपरिषदेचे निवडून आलेले वंचितच्या नगरसेवकावर कारवाई व्हावी यासाठी आयुक्त जिल्हाधिकारी यांच्या दालनात पाठपुरावा केला वंचित बहुजन आघाडीशी संबंधित पदाधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या या याचिकेत काही विशिष्ट नगरसेवकांवर पक्षविरोधी कारवाईचा आरोप करण्यात आले असुन या मध्ये नगरसेवकांची नावे समोर आली आहेत : तसव्वर खान तस्लीम खान, प्रभाग क्र. २ (ब), सुनंदा नंदु सोळंके, प्रभाग क्र. २ (अ) कुरे शमीम बादुल रफीक, अब्दुल प्रभाग क्र. ४ (अ), अब्दुल शब्द अब्दुल अजिज, प्रभाग ४ (ब) निजाद्दीन इस्लामुद्दीन, प्रभाग क्र. ५ (अ), पटेल फहेमिदाबी कलीमोद्दीन, प्रभाग क्र. २ क्र. ५ (ब) याचिकेनुसार, संबंधित नगरसेवकांनी पक्षाच्या अधिकृत आदेशांचे उल्लंघन करत वेगळ्या गटाशी संलग्नता दर्शवली, तसेच गटनेतृत्व आणि बैठकीतील निर्णय प्रक्रियेत अनियमितता केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे, २५ डिसेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ दरम्यान विविध बैठका, नोटिसा आणि निर्णयांची प्रक्रिया पार पडली. मात्र, काही नगरसेवकांनी या आदेशांचे पालन न केल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. याचिकेत संबंधित कायद्यांच्या तरतुदींचा आधार घेत या सर्व नगरसेवकांना अपात्र घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाकडून या प्रकरणाची चौकशी सुरू होण्याची शक्यता असून, यामुळे नगर परिषदेत सत्तासमीकरणांवर मोठा परिणाम होऊ शकतो. याचिकेत महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था कायद्याच्या तरतुदींचा आधार घेत संबंधित नगरसेवकांना अपात्र घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे. जर आरोप सिद्ध झाले, तर: नगरसेवक पद गमवावे लागू शकते, पोटनिवडणुका लागू शकतात, नगर परिषदेत सत्तांतर होऊ शकते सध्या प्रशासनाकडून या प्रकरणाची प्राथमिक तपासणी अपेक्षित आहे. अधिकाऱ्यांकडून संबंधित नगरसेवकांना नोटिसा देऊन त्यांचे स्पष्टीकरण मागवले जाऊ शकते. या प्रकरणावर अद्याप संबंधित नगरसेवकांकडून अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली तरी, मूर्तिजापूर नगर परिषदेत सुरू झालेला हा वाद केवळ अंतर्गत राजकारणापुरता मर्यादित नसून, तो थेट सत्तासमीकरणांवर परिणाम करू शकतो. येत्या काही दिवसांत प्रशासनाचा निर्णय आणि संबंधित नगरसेवकांची भूमिका यावर संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे. या प्रकरणात वंचित बहुजन आघाडीचे नेते अँड आंबेडकर यांची भूमिका महत्वपूर्ण ठरली आहे.

# घंटागाडी मोफत करण्याची शिवसेना ( उबाठा ) ची मागणी

◆ अन्यथा 'कचरा फेको' आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला :** शहरातील कचरा संकलनाच्या नावाखाली सामान्य नागरिक आणि व्यापाऱ्यांची होणारी लूट थांबवून घंटागाडी सेवा पूर्णपणे मोफत करावी, अशी मागणी शिवसेना (उबाठा) गटनेते विजय इंगळे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी अकोला महानगरपालिका आयुक्तांना सविस्तर निवेदन देऊन प्रशासकीय कारभारावर गंभीर ताशेरे ओढले आहेत.

विजय इंगळे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, अकोलेकर आधीच मोठा मालमत्ता कर भरत असताना त्यांच्याकडून कचरा संकलनासाठी सक्तीची वसुली केली जात आहे. शेजारील अमरावती महानगरपालिका जर ही सेवा मोफत देऊ शकते, तर अकोल्यातच वसुली का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.कचरा संकलनाचे दर ३० रुपयांवरून ५० रुपये करण्यात आले, तेव्हा लोकप्रतिनिधींनी मूकसंमती देऊन अकोलेकरांचे हित कंत्राटदाराच्या घशात घातल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

व्यापाऱ्यांकडून ५०० ते १००० रुपये वसूल केले जातात, मात्र त्यांना केवळ ५० ते २०० रुपयांच्या पावत्या दिल्या जात आहेत. यामागे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे निवेदनात म्हटले आहे. कंत्राटानुसार दररोज कचरा उचलणे बंधनकारक असताना अनेक भागात दोन-तीन दिवस घंटागाडी येत नाही. महापालिकेने स्वतःच्या कोट्यवधींच्या गाड्या कंत्राटदाराला दिल्या असून डिझेल आणि देखभालीचा खर्चही महापालिकाच करत आहे. तरीही नागरिकांकडून पैसे घेणे म्हणजे कंत्राटदाराचा फायदा करणे होय, असे इंगळे यांनी म्हटले आहे.प्रशासनाने ही वसुली तात्काळ थांबवून सेवा मोफत न केल्यास महानगरपालिकेवर 'कचरा फेको' आंदोलन छेडण्याचा इशारा विजय इंगळे यांनी दिला आहे.




### शिवसेनेच्या प्रमुख मागण्या

१. घंटागाडी सेवा तात्काळ मोफत करण्यात यावी.
२. व्यापाऱ्यांच्या मनमानी वसुलीची चौकशी करावी.
३. दररोज कचरा न उचलणाऱ्या कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी.
४. नवीन 'दुहेरी खर्चिक' पद्धतीबाबत श्वेतपत्रिका काढावी.

# मोठ्या श्रीराम मंदिरात रामनवमी उत्सवाची जय्यत तयारी

◆ रंगरंगोटी तसेच अंतर्गत सजावटीला प्राधान्य

प्रतिनिधी १८ मार्च



**अकोला :** मोठ्या राम मंदिरात श्री रामनवमी उत्सवाची जय्यत तयारी सुरु आहे. मंदिरात भजन कीर्तनाची जुनी परंपरा असून भाविक विविध कार्यक्रमात सहभागी होतात. सध्या मंदिराचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. भगवे पडदे, झुमर लावले जात आहे. १९ ते २९ मार्च पर्यंत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.

श्रीरामनवमी उत्सवात श्रीराम पंचायतन अभिषेक, दुपारी महिला मंडळाची भजने, सुंदरकांड, सई रानडे यांची नृत्य नाटिका आदी कार्यक्रम होणार आहेत. गुरूवार २६ रोजी दुपारी १२ वाजता श्री राम जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात येईल. शनिवार, २८ रोजी गोपालकाला कीर्तन सकाळी १० ते १२ आणि दुपारी ४ ते ६ वाजेदरम्यान होईल आणि २९ मार्च रोजी एकादशीच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. उत्सवातील विविध कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री राम व हरीहर संस्थान कडून करण्यात आले आहे.

# दक्षता नगर उड्डाण पुलावर चारचाकी गाडीला भीषण आग

अग्निशमन दलाच्या प्रयत्नांमुळे आग आटोक्यात

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला :** दक्षता नगर उड्डाण पुलावर मंगळवारी सायंकाळी धावत्या चारचाकी गाडीला अचानक आग लागल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, गाडी पूर्णतः जळून खाक झाली आहे. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग नियंत्रणात आणण्यात यश आले आहे.

दक्षता नगर उड्डाण पुलावरून चारचाकी गाडी जात असताना अचानक गाडीमधून धूर निघू लागला आणि काही क्षणातच गाडीने पेट घेतला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ अग्निशमन दलाला कळवले.अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत तात्काळ आग विझवण्याचे काम सुरू केले. त्यांच्या अथक प्रयत्नांनंतर काही वेळातच आग नियंत्रणात आणण्यात यश आले. मात्र, तोपर्यंत



गाडी पूर्णतः जळून खाक झाली होती.या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही, ही दिलासादायक बाब आहे. मात्र, गाडीला आग लागण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून याबाबत अधिक तपास सुरू आहे. या घटनेमुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता.




सकल राजस्थानी समाजातील महिला व युवतींच्या वतीने धुलीवंदनापासून चैत्र शुक्ल पक्ष तृतीया तिथीपर्यंत गणगौर उत्सव मोठ्या भक्तीभावात साजरा करण्यात येत आहे. शहरातील सरकारी बगीच्यात मोठ्या संख्येने महिला व युवती एकत्र येऊन मंगल कलश सजवत गणगौरची पारंपरिक गीते गात अखंड सौभाग्याची प्रार्थना केली. १६ दिवस चालणाऱ्या या उत्सवात महिला व युवती श्रद्धा आणि भक्तीने सहभागी होत असून, आपल्या मनासारखा जीवनसाथी मिळावा यासाठी त्या मनोभावे पूजन व प्रार्थना करीत आहेत.

# उत्तर प्रदेश सारखा निर्णय घेईल काय राज्य सरकार ?

◆ उत्तर प्रदेशात एक एप्रिल पासून उत्पादकांना प्रत्येक अंड्यावर द्यावी लागेल एक्सपायरी डेट

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला :** राज्यात अंडे शौकिलांसाठी दररोज सुमारे एक कोटी अंड्याची मागणी आहे मात्र राज्यातील पोल्ट्री व्यवसायाकडून ही संपूर्ण मागणी भागविणे शक्य होत नसल्याने आंध्र प्रदेश व तेलंगणातून मोठ्या प्रमाणात अंड्याचा पुरवठा महाराष्ट्रात केला जातो त्या बाहेरील पुरवठ्यावरच राज्यातील अंड्याची बाजारपेठ मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. अशीच परिस्थिती उत्तर प्रदेश सारख्या राज्याची सुद्धा आहे. अनेकदा ही अंडी आंध्र प्रदेश व तेलंगणातून आल्यानंतर खराब होतात त्यामुळे विक्रेत्यांना तसेच ग्राहकांना सुद्धा आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागतो तसेच खराब अंडी खाल्ल्याने आरोग्याचा प्रश्न सुद्धा निर्माण होतो. अनेकांना खराब अंडे खाल्ल्याने फूड पॉययझनिंग झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे उत्तर प्रदेश सरकारने एक एप्रिल पासून अंडी उत्पादकांना प्रत्येक अंड्यावर मुदत समाप्तीची तारीख छापणे बंधनकारक केले आहे अंड्यावर ते वितरित केल्याची तारीख



ही नमूद करावी लागेल उत्तर प्रदेशच्या पक्ष संवर्धन विभागाच्या म्हणण्यानुसार नियमाचे उल्लंघन केल्यास व्यापारी आणि शेतकऱ्यांची अंडी नष्ट केली जातील किंवा खाण्यासाठी अयोग्य म्हणून चिन्हांकित केली जातील सामान्य तापमानात ( सुमारे ३० अंश सेल्सिअस) ठेवल्यास अंडी घातल्याच्या तारखेपासून दोन आठवड्यापर्यंत अंडे खाण्यासाठी सुरक्षित मानले जाते. आपल्या महाराष्ट्रात तर वर्षातील आठ महिने चांगलेच ऊन असते त्यामुळे अंडी खराब होण्याचा मोठ्या प्रमाणात धोका असतो. सध्या तर इराण व इस्त्रायल युद्धामुळे निर्यात ठप्प झाल्याने महाराष्ट्रात अंड्याचे भाव प्रति शेकडा ७५० वरून थेट पाचशे रुपये पर्यंत खाली आले आहेत यामुळे हॉटेल व्यवसाय आणि मागणी कमी झाल्याने दरात मोठी घसरण झाली आहे. दरातील या तीव्र घसरणीमुळे पोल्ट्री उत्पादकांना उत्पादन खर्चाची ही भरपाई होत नसल्याने व्यवसाय अडचणीत सापडला आहे जर बाहेरील राज्यातून येणाऱ्या अंड्यांवर एक्सपायरी डेट ची सक्ती लागू केल्यास राज्यातील पोल्ट्री उत्पादक आणि कोंबड्या पाळणाऱ्या शेतकऱ्यांना मोठी मदत मिळू शकेल तसेच राज्यातील जनतेला मुदत बाह्य अंडयां ऐवजी ताजी अंडे खावयास मिळतील. जेणेकरून त्यांचे आरोग्य सुद्धा व्यवस्थित राहील हे पाहता राज्य सरकार असा उत्तर प्रदेश सरकार सारखा निर्णय घेईल काय ? असा प्रश्न समोर येत आहे

# मूर्तिजापूरला सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यांवर कारवाई

प्रतिनिधी १८ मार्च

**मूर्तिजापूर:** मध्य पूर्वेतील युद्धाचा परिणाम राज्यासह अकोला जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दिसत आहे. घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यांवर जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनात जिल्हा पुरवठा विभाग गेल्या दोन दिवसां पासून कारवाई करत आहे. जिल्हा पुरवठा विभागाच्या पथकाने आज मूर्तिजापूर शहरात कारवाई करीत खाजगी हॉटेलमधून घरगुती वापरात येत असलेले सात गॅस सिलिंडर जप्त केले. आज जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र एन्नावार, मुर्तिजापूर पुरवठा निरीक्षक आनंद गुप्ता, अकोला पुरवठा निरीक्षक भोपळे यांनी मुर्तिजापुर शहरातील खाजगी खानावळी तसेच हॉटेलमध्ये तपासणी केली असता त्यांनी सात घरगुती वापराचे गॅस सिलिंडर जप्त केले. या कारवाईमुळे शहरातील सिलिंडरचा काळाबाजार



करणाऱ्यांमध्ये एकच धावपळ उडाली. काल उशिरा सायंकाळी अकोला शहरातील जीएमडी मार्केट मधील हिरा कॅटरिंग मधून घरगुती वापरात असलेले नऊ सिलेंडर जप्त करण्यात आले होते. अकोला जिल्ह्यात सिलिंडरचा काळा बाजार होत असल्यास याबाबतची माहिती नागरिकांनी जिल्हा पुरवठा विभागाला द्यावी असे आवाहन संबंधित प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# कमाल वेदना निवारण केंद्रामध्ये 19 व 20 मार्च रोजी विशेष कँपचे आयोजन

कोणत्याही व्याधीपासून त्वरीत सुटका

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला :** आजच्या गतिमान युगात प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या व्याधीने त्रस्त आहे. महागडी औषधे घेऊनही अनेक रुग्णांना आराम मिळत नाही. स्नायू, सांधे, गुडघे, कंबरदुखी इत्यादी त्रासाने त्रस्त असलेल्या रुग्णांना तात्काळ आराम मिळवून देण्यासाठी, शहरातील 'कमाल वेदना निवारण केंद्र' मध्ये १९ आणि २० मार्च रोजी आयोजित कँपचा लाभ घेण्याचे आवाहन केले



आहे. नॅचरोपॅथी, ?क्युथेरपी आणि कायरोप्रॅक्टिक उपचार पद्धतीनंतर कमाल वेदना निवारण केंद्रामध्ये फक्त पंधरा ते वीस मिनिटांत वेदनेतून आराम मिळतो, असा दावा आग्रा येथील सुप्रसिद्ध बी.ई.एम.एस. नेचरोपॅथी व कायरोप्रॅक्टिक तज्ज्ञ डॉक्टर तरुण यादव आणि थेरपिस्ट डॉ. उदेन खान यांनी केला आहे. गुडघेदुखी, कंबरदुखी, मानदुखी, मणक्याच्या हाडामध्ये गॅपमुळे होणारी वेदना, हात-पायांना मुंग्या येणे, पायात पेटके येणे, मायग्रेनचा त्रास, छातीत दुखणे, पायांची जळजळ, अंगदुखी, मणक्याच्या हाडात गॅप, हात उचलता न येणे, हातामध्ये पेटके येणे किंवा शरीरात कोठेही वेदना असल्यास, या सर्व जुन्या दुखण्यांपासून मुक्ती मिळते. डॉ. तरुण यादव यांच्या मदतीने येथे एक ते दहा वर्षांपर्यंतच्या जुन्या वेदनेपासून केवळ १५ ते २० मिनिटांत पूर्णपणे आराम मिळू शकतो. आतापर्यंत डॉ. तरुण यादव यांनी शेकडो रुग्णांवर उपचार करून त्यांना रोगमुक्त केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल अनेक मोठे राजकारणी, उद्योगपती आणि सामाजिक संघटनांनी त्यांचा सत्कार केला आहे. १९ आणि २० मार्च रोजी आयोजित कँपचा लाभ घेण्याचे आवाहन रुग्णांना करण्यात आले आहे. महिलांसाठी येथे स्वतंत्र व्यवस्था आहे आणि ऑनलाईन नोंदणीची सोय देखील उपलब्ध आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी कमाल वेदना मुक्त केंद्र मंगरूळपीर रोड, युसुफ अली खदान गणेश शटरच्या बाजूला तसेच कृपया खालील मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा: मोबाईल क्रमांक ९०४९८३१५७३ तसेच ८६२३८८८४४३.



# एसटी बस चढली चक्क फलाटावर !

◆ तेल्हारा बसस्थानकातील प्रकार : दोन महिला जखमी, सुदैवाने मोठा अनर्थ टळला

प्रतिनिधी १८ मार्च

**तेल्हारा :** शेगाव आगाराची बस चालकाच्या चुकीमुळे थेट बसस्थानकाच्या फलाटावर घुसल्याची धक्कादायक घटना १७ मार्च दुपारी दोनच्या सुमारास घडली. या अपघातात फलाटावर बसची प्रतीक्षा करत असलेल्या दोन महिला प्रवासी किरकोळ जखमी झाल्या असून मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, शेगाव डेपोची बस प्रवासी घेऊन तेल्हारा बसस्थानकात आली होती. येथून परतीच्या प्रवासासाठी बस उभी करताना चालकाचा ताबा सुटल्याने बस थेट फलाटावर घुसली. यावेळी फलाटावर बसलेल्या प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. या दुर्घटनेत दोन महिला प्रवासी जखमी झाल्या असून त्यांची नावे समजू शकली



नाहीत. जखमी महिलांना तत्काळ तेल्हारा येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सुदैवाने दोघींनाही किरकोळ दुखापत झाली असून प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच तेल्हारा आगार प्रमुख मिथुन शर्मा व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. प्राथमिक चौकशीत चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडल्याचे समोर येत आहे. दरम्यान, तेल्हारा पोलिसांनीही घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

### चौकशीचे आदेश

◆ या गंभीर प्रकाराची आगारप्रमुखांनी दखल घेतली असून या घटनेप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आगार प्रमुख मिथुन शर्मा यांनी सांगितले.

# फेरीवाल्यांमुळे वाहतुकीची कोंडी

प्रतिनिधी १८ मार्च

**अकोला :** महानगर पालिकेला न जुमानता फेरीवाल्यांमुळे वाहतुकीची कोंडी होत आहे.

नागरिकांना दररोज त्रास होत आहे. शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ आणि चौकात चौकात सध्या अतिक्रमाणाचा विळखा दिसतो. शहरातील मुख्य मार्गावर, भर रस्त्यावर दुकाने लावून व्यवसाय सुरू असल्याने वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. प्रशासनाने वाढत्या अतिक्रमणाला आळा घालण्यासाठी तातडीने पाऊले उचलावी जेणेकरून रोजची डोकेदुखी राहणार नाही. महापालिका प्रशासनाकडून अतिक्रमण हटाव मोहिम राबवून देखील फरक पडत नाही.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK